## शेगाव संस्थानकडून दुष्काळग्रस्तांसाठी १ कोटी ११ लाखांचा निधी



**बुलढाणा** : राज्यात कमी पर्जन्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक संकटामुळे राज्यातील शेतकरीवर्ग अडचणीत सापडला असून सरकारने कोरड्या दुष्काळाची घोषणा केली आहे. अशा कठीण परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानने पुढाकार घेतला असून संस्थानच्या प्रतिनिधींनी रविवारी (दि.२७) मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मुख्यमंत्री सहायता निधीस १ कोटी ११ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. श्री गजानन महाराज संस्थान हे केवळ अध्यात्मिक केंद्र नसून सामाजिक बांधिलकी जपणारी अग्रगण्य संस्था म्हणूनही ओळखले जाते. यापूर्वीही वर्ष २०१९ व २०२५मध्ये राज्यातील नैसर्गिक आपत्तीच्या वेळीदेखील संस्थानने सहायता निधी दिला होता.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ७१
www.ramprahar.com

◆ सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


टेमघर नाल्यात मृत माशांचा खच/२
खाडीकिनारा स्वच्छतेसाठी एकवटले हजारो हात!/६
जिंदल विद्यामंदिरच्या खेळाडूंची चमक/८


# दहशतवाद सहन करणार नाही!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पाकिस्तानला इशारा; झीरो टोलरन्स धोरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने प्रदीर्घ काळ दहशतवादाच्या ज्या यातना आणि जखमा सोसल्या, त्याला हे सर्जिकल स्ट्राइक म्हणजे एक निर्णायक आणि चोख प्रत्युत्तर होते. भारत आता दहशतवादाच्या विरोधात 'शून्य सहनशीलता' (झीरो टोलरन्स) धोरण अवलंबत असून दहशतवादी कारवायांना सडेतोड आणि निर्णायक उत्तर दिले जाईल, असा थेट इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शत्रू राष्ट्रांना विशेषतः पाकिस्तानला दिला आहे. ते रविवारी (दि.२७) मन की बात कार्यक्रमात बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात' या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या १३८व्या भागात २०१६च्या ऐतिहासिक सर्जिकल स्ट्राइकच्या १०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत भारतीय लष्कराच्या शौर्याला उजाळा दिला आणि देशसुरक्षेवर महत्त्वपूर्ण भाष्य केले. त्याचप्रमाणे अन्य विविध विषयांवर चर्चा केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले, दहशतवादी हल्ल्यांमुळे भारताला दीर्घकाळ मोठे नुकसान सहन करावे लागले. एक काळ असा होता की भारतात साखळी बॉम्बस्फोट ही सामान्य बाब झाली होती. याच सप्टेंबर महिन्यात १३ सप्टेंबर २००८ रोजी दिल्लीत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांमध्ये अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काही आठवड्यांतच मुंबईत २६/११सारखा मोठा दहशतवादी हल्ला झाला. यापूर्वीही प्रत्येक दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात कारवाईची मागणी केली जात होती, मात्र त्याकडे तितकेसे लक्ष दिले जात नव्हते. केवळ वेळ निघून जाण्याची वाट पाहिली जात असे, परंतु आजचा भारत दहशतवादाविरोधात 'झीरो टोलरन्स' धोरणासह पुढे जात आहे आणि त्याचे परिणामही आपण पाहत आहोत.

यावेळी पंतप्रधान मोदींनी विश्व हिंदू परिषदेचे माजी आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष दिवंगत अशोक सिंघल यांचे स्मरण केले. त्यांचा जन्म १९२६मध्ये आजच्याच दिवशी आग्रा येथे झाला होता. पंतप्रधान म्हणाले, आज २७ सप्टेंबर ही तारीख एका विशेष कारणामुळे आणखी महत्त्वाची ठरली आहे. आज अशा एका महान व्यक्तिमत्त्वाची १००वी जयंती आहे, ज्यांनी आपले संपूर्ण जीवन संस्कृती, समाज आणि देशासाठी समर्पित केले.

आपल्या संबोधनात पंतप्रधान मोदी यांनी यावर्षीच्या सुरुवातीला आयोजित करण्यात आलेल्या सोमनाथ स्वाभिमान पर्वाचाही उल्लेख केला. ते म्हणाले, आपण या वर्षाची सुरुवात स्वाभिमानाच्या एका मोठ्या पर्वाने केली, ते होते सोमनाथ स्वाभिमान पर्व. सुमारे एक हजार वर्षांपूर्वी १०२६मध्ये महम्मद गझनीने प्रथमच सोमनाथ मंदिराचा विध्वंस केला होता, मात्र सोमनाथचा विध्वंस करून भारताची ओळख मिटवण्यासाठी आलेल्या लोकांचे आज कोणतेही अस्तित्व नाही.

पर्यावरण संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जेव्हा आपण पर्यावरणाचे रक्षण करतो, तेव्हा आपण केवळ झाडे, वनस्पती आणि वन्यजीवांचे संरक्षण करत नसतो, तर जीवन टिकवून ठेवणाऱ्या संपूर्ण परिसंस्थेलाही बळकटी देत असतो. देशाच्या विविध भागांत सुरू असलेले काही प्रयत्न ही भावना प्रभावीपणे अधोरेखित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय नशामुक्त भारत अभियानाची गरज आणि एक जिल्हा एक उत्पादन अर्थात ओडीओपी उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्याबाबत पंतप्रधानांनी मार्गदर्शन केले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी जनसहभाग आवश्यक असल्याचे प्रतिपादन करीत नागरिकांना विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाचे आवाहन त्यांनी केले.



### डिजिटल जनगणनेचा उल्लेख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी डिजिटल जनगणनेबाबत म्हणाले की, सध्या देशाची महत्त्वाची चित्रे तयार होत आहेत. या चित्रांत तुम्ही, तुमचे कुटुंब आणि शेजारीही आहेत. मी भारताच्या जनगणनेबद्दल बोलत आहे. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये डिजिटल जनगणनेचा पहिला टप्पा जवळपास पूर्ण झाला आहे. देशातील ३२ कोटींपेक्षा अधिक कुटुंबांची माहिती यापूर्वीच नोंदवण्यात आली आहे. सध्या लडाख, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमधील दुर्गम तसेच बर्फाच्छादित भागांतही जनगणनेचे काम सुरू आहे. या भागांतून प्रेरणादायी अनुभव समोर आलेत.





**पनवेल, उरण : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाच्या १३८व्या भागाचे रविवारी पनवेल आणि उरण भाजपच्या कार्यालयात थेट प्रक्षेपण पाहण्यात आले. पनवेलमधील जनसंपर्क कार्यालयात भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, तर उरणमधील जनसंपर्क कार्यालयात आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते आणि नागरिकांनी हा कार्यक्रम पाहिला व ऐकला. यावेळी भाजपचे पनवेल शहराध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव, युवा नेते प्रभुदास भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.**

# संवैधानिक संस्थांना बदनाम करून देशात अराजकता पसरवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न

## मुख्यमंत्र्यांचा राहुल गांधींवर घणाघात

**नागपूर : प्रतिनिधी**

"काँग्रेस नेते राहुल गांधी सातत्याने संविधानविरोधी भूमिका मांडत आहेत, घटनात्मक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न करताहेत. जनतेचा काँग्रेसवर विश्वास उरलेला नाही. त्यामुळे सिस्टमविरोधात जनतेत अराजकता निर्माण करायची ही काँग्रेसची रणनीती आहे, मात्र त्यांचे मनसुबे कधीही पूर्ण होऊ देणार नाही," असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.२७) केला.

नागपुरात रामगिरी येथे पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संविधान हातात घेऊन संविधानिक संस्थांवर रोज प्रश्न उपस्थित करणे आणि या संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न करणे अशी राहुल गांधींची भूमिका आहे. ते जरी भारतीय संविधान दाखवत असले तरी त्यांना या संविधानात दिलेली लोकशाही मान्य नाही, लोकशाहीने दिलेल्या संविधानिक संस्था मान्य नाहीत. यापूर्वी ते पराभूत झाले की ईव्हीएमला दोष देत होते. आता थेट निवडणूक आयुक्तांनाच घेरण्याची रणनीती त्यांनी केली आहे, पण तीनही निवडणूक आयुक्तांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमुळे राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केलेला कथित फेक नॅरेटिव्ह उद्ध्वस्त झाला आहे.

राहुल गांधी यांना आतापर्यंत काहीही सिद्ध करता आले नाही. उलट त्यांनी सर्जिकल स्ट्राइकवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चीनच्या सीमेवर तैनात जवान चीनकडून मार खात असल्याचे विधान करून जवानांचा अपमान केला. ते सतत खोटे बोलतात आणि नंतर न्यायालयात माफी मागतात. आता ते व्होटचोरी म्हणत आहेत, मात्र यांचा मेंदू चोरीला गेलेला आहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती करतो की, एखादी चौकशी समिती तयार करता येईल का, जी यांचा चोरी गेलेला किंवा गहाण ठेवलेला मेंदू परत आणून देईल? तो त्यांना परत मिळेल, अशी एखादी व्यवस्था करता येईल का? असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

यावेळी एसआयआर प्रक्रियेवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनेक वर्षांपासून ही प्रक्रिया झालेली नव्हती. त्यामुळे मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण आवश्यक होते. पश्चिम बंगालमध्ये ज्या क्षेत्रात एसआयआरच्या माध्यमातून मतदार कमी झाले, अशा १५ ठिकाणी तृणमूल काँग्रेस विजयी झाली. निवडणूक प्रक्रियेवर सातत्याने प्रश्न उपस्थित करण्याऐवजी विरोधकांनी आत्मपरीक्षण करावे, असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला.

दरम्यान, केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची कार्यपद्धती आणि एसआयआर प्रक्रियेविरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत मोर्चा काढणार आहेत. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा राजकीय स्टंट असल्याचे म्हटले.



### दुष्काळग्रस्तांच्या अडचणी दूर करणार

राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळणार का? असा प्रश्न यावेळी पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपण काल २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. या सर्व तालुक्यांना दिली जाणारी मदत ही सरसकटच दिली जाणार आहे. काही ठिकाणी अशा तक्रारी येत आहेत की यामध्ये आमच्या तालुक्याचा समावेश करण्यात आला नाही. त्या तालुक्यांचीदेखील पाहणी करून दुष्काळग्रस्त म्हणून समावेश करणार आहोत. या पार्श्वभूमीवर ज्या काही अडचणी आहेत, त्या दूर करण्याच्या अनुषंगाने सरकार पावले उचलत आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## निवडक

### मुंबईत सार्वजनिक शौचालयात गुदमरून दोघांचा करुण अंत

**मुंबई** : तीव्र रासायनिक वासामुळे दोन तरुणांचा सार्वजनिक शौचालयात गुदमरून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.२७) मध्यरात्री गोरेगावमध्ये घडली. प्रभाकर धनीवार (२४) आणि भावीन देसाई (१८) अशी मृत तरुणांची नावे असून शौचालयाशेजारी असलेल्या कारखान्यातून बाहेर पडलेल्या रसायनामुळे विषारी वायू तयार होऊन हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

### देवस्थान इनाम जमीन प्रारूप समितीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई** : राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या व्यवस्थापनात आणि कायदेशीर चौकटीत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यासाठी नव्या कायद्याचा (प्रारूप अधिनियम) मसुदा तयार करणाऱ्या उच्चस्तरीय समितीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यभरातून प्राप्त झालेल्या हजारो हरकती, विविध न्यायालयांचे निकाल आणि सर्वपक्षीय प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यासाठी अतिरिक्त वेळेची गरज भासल्याने शासनाने हा निर्णय घेतला आहे.

# कोकणातही यंदा दुष्काळाच्या झळा!

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. यामध्ये कोकणातील काही तालुक्यांचा समावेश आहे. दुष्काळी भागात विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अल निनोमुळे यंदा पर्जन्यमानात तूट आली आहे. परिणामी राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळ आहे. खरीप हंगामातील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य दुष्काळी निकषांच्या आधारे कोकणातही रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर, राजापूर व रत्नागिरी; तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड व वेंगुर्ला या तालुक्यांचा समावेश आहे. कोकणातील ठाणे व पालघर या जिल्ह्यांमध्ये चांगले पर्जन्यमान झाले असून तेथे दुष्काळ नाही.

### शासनाकडून मिळणार मदत

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६नुसार करण्यात आलेल्या मूल्यांकनाच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झाल्याचे कृषी आयुक्तांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पंचनाम्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे आणि जीपीएस कोऑर्डिनेट्स संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनाला सादर करण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालू वीजबिलात सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे रोजगार हमी योजनेंतर्गत कामांचे निकष शिथिल करून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतीपंपांची वीज जोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे यांसारख्या उपाययोजनाही करण्यात येणार आहेत. याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर होईल.



**पनवेल : मुख्य गणेशोत्सवानंतर आता गौरा-गणपतींचे वाजतगाजत आगमन सुरू झाले आहे.**

# पोलादपूरच्या लोहारे येथे जुगार अड्ड्यावर छापा

## ४२ आरोपींची पोलिसांकडून धरपकड

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरजवळील लोहारे येथील जुगाराच्या अड्ड्यावर शनिवारी दुपारी अलिबाग पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार छापा टाकण्यात आला. यावेळी ४२ आरोपींची धरपकड करून एक लाख तीन हजार ९४० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

लोहारे येथे जुगाराचा अड्डा सुरू होता. याविरोधात विधान परिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी जाहीर सभेत आवाज उठवला होता. त्याची दखल घेत अलिबाग पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार म्हसळा परिमंडळ उपअधीक्षक योगिता कुंटे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने शनिवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास लोहारे येथे छापा टाकला. (सविस्तर पान ७ वर..)


दै. रामप्रहर दिवाळी अंक २०२६

पिढ्यांच्या पाऊलखुणा...

रामप्रहर

दिवाळी अंकांना महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात समृद्ध परंपरा लाभली आहे. 'रामप्रहर'नेही ही परंपरा सातत्याने जपली आहे. यंदाच्या दिवाळी अंकासाठी विविध क्षेत्रातील पिढ्यांचा प्रवास हा विषय घेण्यात आला आहे. या मुख्य विषयासोबतच अंकात कथा, कविता, व्यंगचित्रे, लेख, ललित लेखन अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे लेखनाची आवड असलेल्या साहित्यिक, लेखकांना या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपले साहित्य वाचकांपर्यंत पोहचवण्याची संधी मिळणार आहे.
प्राप्त साहित्याचा यथायोग्य विचार करून दिवाळी अंकासाठी निवड करण्यात येईल.

आपले साहित्य ७ ऑक्टोबरपर्यंत टाइप करून
ramprahar@gmail.com
या ई-मेलवर पाठवावे.

# रासायनिक प्रदूषणाने टेमघर नाल्यात मृत माशांचा खच; परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड एमआयडीसीतील टेमघर नाल्यात प्रदूषित पाणी मिसळल्याने असंख्य मासे, जलचर मृत्युमुखी पडल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली आहे. नाल्यात मृत माशांचा अक्षरशः खच पडला असून, वाम, खवल, शिवडा, मळे, दांडणी यांसह विविध जातींच्या लहान-मोठ्या माशांचा यामध्ये समावेश आहे.जिते गावच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरातील एका औद्योगिक आस्थापनाच्या शेजारील नाल्यातून पिवळसर रंगाचे प्रदूषित पाणी वाहत असून, याच ठिकाणापासून मासे मृत्युमुखी पडण्यास सुरुवात झाल्याचे दिसून आले आहे.

मृत माशांचा हा खच टेमघर गावापासून थेट काळ नदीपर्यंत पसरला आहे. नाल्यात फेसाळयुक्त व लालसर रंगाचे रासायनिक पाणी वाहत असून, परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. दरम्यान, एमआयडीसीच्या मुख्य रस्त्यावरील पुलाखालून देखील रासायनिक सांडपाणी बाहेर पडत असल्याचे निदर्शनास आले असून या ठिकाणी सांडपाणी वाहून नेणारी एखादी वाहिनी फुटली असावी, असा प्राथमिक अंदाज देखील वर्तविण्यात येत आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी भेट देऊन संबंधित नाला तसेच काळ नदीच्या संगम परिसरातील पाण्याचे नमुने संकलित केले असून ते तपासणीसाठी पुढे पाठवले आहेत. टेमघर नाल्यात मोठ्या प्रमाणात मगरींचा वावर असल्याने त्यांच्यासह अन्य जलचरांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे.



वर्षानुवर्षे सुरू असलेला हा विषारी कारभार रोखणार तरी कोण? असा संतप्त सवाल आता परिसरातील ग्रामस्थ करत आहेत. या घटनेचा महाड शहर विकास मंच या महाडमधील सोशल मीडिया समूहानेही निषेध व्यक्त केला असून महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्याकडे याबाबतीत कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या नाल्यातील प्रदूषण हा नित्याचाच विषय बनला असल्याने वरचेवर होणाऱ्या या घटनेमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असून निसर्गासह मानवी जीविताशी खेळणाऱ्या अशा दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी आणि भविष्यात अशा पद्धतीच्या घटना घडणार नाहीत यासाठी ठोस उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांसह निसर्गप्रेमी व पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

**टेमघर नाल्यात मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी मिसळल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडले आहेत. आम्ही सदर नाल्यातील पाण्याचे नमुने, त्याचप्रमाणे या नाल्याच्या काळ नदीपात्रातील संगमाजवळील नमुनेदेखील जमा केले असून, ते तपासणीसाठी पाठवले आहेत. सदर रासायनिक सांडपाण्याबाबत संपूर्ण परिसराचा तपास केला असता वरील डोंगराळ भागातूनच लालसर पाणी खाली येत असल्याचे व नाल्यात मिसळत असल्याचे दिसून येत आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन हे सांडपाणी नाल्यांमध्ये मिसळण्याची शक्यता दिसून येत आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे.**

**-दर्शन म्हात्रे, क्षेत्र अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड**

# नेरळच्या कुंभार आळीत ट्रान्सफार्मर जळून खाक

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ शहरातील कुंभार आळी परिसरात धारप हॉलसमोर असलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मरला सकाळी साडेनऊच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. ट्रान्सफॉर्मरमधून मोठ्या प्रमाणात आगीचे लोट आणि धूर निघू लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ खळबळ उडाली.



घटनेची माहिती मिळताच सजग नागरिकांनी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने संपर्क साधला. त्यानंतर विद्युत अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र तोपर्यंत ट्रान्सफॉर्मरने मोठ्या प्रमाणात पेट घेतल्याने आग आटोक्यात आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागली.आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी विद्युत कर्मचारी तसेच स्थानिकांनी प्रयत्न केले. आजूबाजूच्या इमारतींमधून बादल्यांमध्ये पाणी आणून आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तब्बल अर्धा ते एक तासाच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

या घटनेत धारप हॉलसमोरील ट्रान्सफॉर्मर पूर्णपणे जळून खाक झाला असून परिसरातील वीजपुरवठ्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी आतापर्यंत एकूण चार ट्रान्सफॉर्मर आगीच्या विळख्यात आल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वेळीच घटनास्थळी धाव घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. परिसरात अनेक इमारती आणि नागरिकांची वर्दळ असतानाही आग आजूबाजूच्या इमारतींमध्ये पसरली नाही तसेच कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ट्रान्सफॉर्मर जळाल्याने परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी विद्युत विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे. आगीचे नेमके कारण काय, याबाबत विद्युत विभागाकडून अभ्यास करण्यात येत असल्याची माहिती सहायक अभियंता दीक्षांत वाघ यांनी दिली.

# विसर्जन स्थळावरील सेवकांना मिळाले मानधन

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गणेश विसर्जन सोहळा यंदा श्रद्धा, शिस्त आणि सुरक्षेच्या वातावरणात अतिशय भव्य व निर्विघ्नपणे पार पडला. वनमंत्री गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, महापौर सुजाता पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि उपमहापौर दशरथ भगत यांच्या सहकार्याने महापालिका प्रशासन, पोलीस यंत्रणा, ग्रामस्थ आणि गणेशभक्तांच्या उत्तम समन्वयातून संपूर्ण विसर्जन सोहळा सुलभ व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यात प्रशासनाला यश आले.

शहराच्या नागरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या प्रवासातही स्थानिक ग्रामस्थांनी गणेश विसर्जनाची आपली पारंपरिक सेवा निष्ठेने जपली आहे. तासन्तास पाण्यात राहून मूर्ती विसर्जन करणाऱ्या या ग्रामस्थ सेवकांच्या श्रमाचा महापालिका प्रशासनाने विशेष गौरव केला. शहरी विकासामुळे प्रभावित झालेल्या स्थानिक ग्रामस्थांना सन्मान आणि रोजगाराची संधी देण्याच्या उद्देशाने पालिका प्रशासनाने प्रत्येक विसर्जन दिवशी या सेवकांना ८०० रुपये मानधन, भोजन आणि टी-शर्ट देऊन त्यांच्या सेवेचा सन्मान केला.

# रायगडातील उर्वरित १४ तालुक्यांचे नुकसान सर्वेक्षण तत्काळ करावे - वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

खरीप २०२६च्या हंगामातील पर्जन्याची तूट आणि पीक परिस्थितीचा आढावा घेऊन राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ मूल्यांकन करणारा 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या शासन निर्णयानुसार कोकण विभागातील रायगड जिल्ह्यातून केवळ श्रीवर्धन या एकाच तालुक्याला या यादीत स्थान मिळाले आहे.

रायगड जिल्ह्यात माणगाव तालुक्यात सर्वाधिक ११,००० हेक्टर भातशेती क्षेत्र आहे. तर उर्वरित तालुक्यांत कर्जतमध्ये १० हेक्टर, महाडमध्ये ९,५००, पेणमध्ये ९,०००, रोहा मध्ये ८५००,अलिबागमध्ये ८,५००सुधागड (पाली)मध्ये ७,०००, खालापूरमध्ये ६,५००,पनवेलमध्ये ६,००० मुरुडमध्ये ४,५००, पोलादपूर आणि तळा तालुक्यांमध्ये ३,५०० ,उरण तालुक्यात सर्वात कमी म्हणजेच २,५०० हेक्टर भातशेती क्षेत्र आहे, तर श्रीवर्धन मध्ये ४००० व म्हसळा तालुक्यांत ४,००० हेक्टर भातशेती आहे. अशा परिस्थितीत केवळ श्रीवर्धन तालुक्यांतच नुकसान होणे आणि त्यास दुष्काळी तालुक्यांत समाविष्ठ करणे कितपत योग्य आहे असा सवाल कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनीच केला आहे.

अलिबाग, पेण, खालापूर, कर्जत, महाड, मुरुड आणि रोहा या भागांमध्ये यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे भात पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पावसाची पडलेली ओढ आणि पिकांवर पडलेला कीड-रोगांचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. असे असतानाही केवळ श्रीवर्धन तालुक्याचीच निवड झाल्याने उर्वरित बाधित तालुक्यांतील पंचनामे



आणि सवलतींचे काय, असा गंभीर सवाल उपस्थित केला जात आहे. कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी या निर्णया बाबत अत्यंत तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

शासनाने 'ट्रिगर-१' लागू झालेल्या श्रीवर्धनसह सर्व २६५ तालुक्यांमध्ये तत्काळ पंचनामे सुरू करून पिकांच्या स्थितीचे जीपीएस फोटो व अहवाल सादर करण्याचे निर्देश कृषी आयुक्तांना दिले आहेत. या तालुक्यांसाठी शासनाने जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जाच्या वसुलीस स्थगिती, ७.५ एचपी पेक्षा मोठ्या कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि रोहयो कामांच्या निकषांत शिथिलता अशा विविध सवलती घोषित केल्या आहेत.

स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधींकडून आता मागणी केली जात आहे की, रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, खालापूर, कर्जत, महाड, मुरुड आणि रोहा या तालुक्यांतील नुकसानीचेही तातडीने पुनर्मूल्यांकन करून त्यांना या दुष्काळसदृश सवलतींच्या जाळ्यात समाविष्ट करावे.

***रायगड जिल्ह्यातील सात ते आठ तालुक्यांमध्ये भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या पावसाने पुर्णपणे ओढ दिले असल्याने येत्या काळात उर्वरित तयार होण्याच्या टप्प्यातील भातशेतीचे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत केवळ श्रीवर्धन तालुक्यांचा समावेश दुष्काळग्रस्त तालुक्यांत करणे योग्य वाटत नाही. जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुक्यांचे नुकसानी सर्वेक्षण नव्याने पून्हा करून राज्य शासनास तत्काळ सादर करण्याच्या सुचना मी आजच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्याना दिले आहेत. त्या जिल्हाधिकारी यांच्याशी बोलून शासनास अहवाल सादर करणार असल्याचे त्यांनी सांगीतले. जिल्ह्यातील एकाही नुकसानग्रस्त शेतकऱ्यावर अन्यय होवू देणार नाही.***

***-वैकुंठ पाटील, कृषी सभापती, रायगड जिल्हा परिषद***

# नेरूळमध्ये भरधाव कारची दुचाकीला धडक; डिलिव्हरी बॉय गंभीर जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ परिसरात भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने डिलिव्हरी बॉय गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. अपघातानंतर कारचालकाने जखमीला कोणतीही वैद्यकीय मदत न करता घटनास्थळावरून पलायन केल्याप्रकरणी नेरूळ पोलिसांनी अज्ञात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अली हुसेन गाझी (३७) हे डिलिव्हरीचे काम करतात. शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ज्युपिटर दुचाकीवरून एसबीआय कॉलनी गेटसमोरील स्पीडब्रेकर ओलांडून डी. वाय. पाटील स्टेडियमसमोरील सर्व्हिस रोडने जात होते. त्यावेळी समोरून आलेल्या निळ्या रंगाच्या कारने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

या धडकेत गाझी यांच्या डाव्या बाजूच्या बरगड्या, हाताचा कोपरा तसेच डाव्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. अपघातानंतर कारचालकाने घटनास्थळी न थांबता तेथून पळ काढला. जखमी गाझी यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# भाजप नेते निलेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली महाआरोग्य शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या 'सेवा संकल्प अभियान' व 'सेवा मेरा योगदान' अंतर्गत रविवारी, सेक्टर-६, सीबीडी येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिर व मोफत औषध वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार . मंदा म्हात्रे यांच्या शुभहस्ते या आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. भाजपा नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस निलेश मंदा विजय म्हात्रे यांच्या विशेष पुढाकारातून हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचा सुमारे १५०० नागरिकांनी लाभ



घेतला.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रताप मुदलियार, अजय मेहरा, तनसुख जैन आणि रायचंद जैन यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स, डी. वाय. पाटील आयुर्वेदिक हॉस्पिटल, मयुरेश हॉस्पिटल, रामकृष्ण नेत्रालय आणि हिअर ॲप यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकांनी नागरिकांची मोफत तपासणी केली.

शिबिरामध्ये रक्तदाब , ब्लड शुगर, ईसीजी , डोळ्यांची तपासणी व मोतीबिंदू निदान, कानांची तपासणी, बालरोग व त्वचारोग अशा विविध आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. महिलांच्या आरोग्यासाठी विशेष महिला डॉक्टरांचे मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात आले. तपासणीनंतर गरजू रुग्णांना आवश्यक आयुर्वेदिक औषधे, गोळ्या, च्यवनप्राश तसेच चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले.या प्रसंगी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# प्रथम येणाऱ्यास प्राधान्य योजने अंतर्गत लाभ घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** सिडकोतर्फे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' योजनेअंतर्गत मधील जुन्या EWS व Non-EWS सदनिका उपलब्ध करून देण्यात येत आहेत. डिसेंबर २०२५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजने अंतर्गतखारघर, तळोजा, कळंबोली आणि द्रोणागिरी नोडमधील विविध सेक्टरमध्ये सदनिका उपलब्ध आहेत. काहीसदनिका अद्याप उपलब्ध असून इच्छुक अर्जदारांना आपल्या पसंतीची सदनिका थेट नोंदणी करून बुक करता येईल.

गृहनिर्माण योजनेतील उपलब्ध ठिकाणे-
तळोजा,सेक्टर- २१, सेक्टर-२२,सेक्टर-२७,सेक्टर-३४, सेक्टर-३६ व सेक्टर-३७ ,खारघर, सेक्टर- ४० ,द्रोणागिरी, सेक्टर-११ व सेक्टर-१२ कळंबोली, सेक्टर- १५ बामणडोंगरी,उलवे

अर्जदार उपलब्धतेनुसार आपल्या पसंतीची सदनिका थेट निवडून बुक करू शकतात. तळोजा आणि द्रोणागिरी नोडमधील विविध सेक्टरमधील या योजनेअंतर्गत सदनिकांच्या किंमती आर्थिकवर्ष २०२२-२३ च्या दरांनुसार आहेत.

# मुरुड समुद्रकिनारी वाहून आलेल्या १४३ मूर्तींचे श्री सदस्यांनी केले पुन्हा विसर्जन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड व मजगव मध्ये जलौषात १० दिवसाचे गणेश मूर्तींचे विसर्जन सोहळा साजरा झाला पण विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी मुरुड ,मजगाव ,राजपुरी ,एकदरा , नांदगाव, समुद्रकिनारी १४३ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्ती वाहून आल्या .



सकाळी समुद्रला ओहोटी लागल्यावर किनारी वाहून आलेले गणेशमूर्ती डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे गणेशमूर्ती ४० श्री सदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात बोटीच्या साह्याने नेऊन विसर्जित केल्या.नंतर संपूर्ण समुद्र किनारा स्वच्छ केला येणाऱ्या पर्यटकांना भग्न मूर्ती दिसू नये म्हणून पहाटे ६ वाजताच श्रीसदस्य किनार्यवर आले काम सुरू केले ,वाहुन आलेल्या मूर्तीना एकत्रित करून छोट्या बोटीतून खोल समुद्रात नेऊन पुन्हा विसर्जित करण्यात आल्या

अनेक मुरुडकरांची व श्रीसदस्यांची मागणी आहे कि मुरुड नगरपालिकेने प्लास्टर पॅरिसच्या मूर्ती विसर्जनासाठी समुद्रकिनारी कृत्रिम तलाव बनवण्यात यावेत त्यामुळे भक्तांना स्वतःच्या हाताने आनंदाने मूर्ती विसर्जित करता येईल व शाडूच्या मुर्त्या समुद्रात विसर्जित कराव्या लागणार नाहीत.

# 'पोस्को'च्या सीएसआर उपक्रमातून शेतकरी संवाद मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या सीएसआर निधीतून शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी संवाद मेळाव्याचा सलग नववा उपक्रम बुधवार, २३ सप्टेंबर रोजी माणगाव येथील कुणबी भवन येथे उत्साहात संपन्न झाला. नैसर्गिक शेती अभ्यासक तथा मृदगंध फार्म्स, अहिल्यानगरच्या संचालक कल्याणी मुरदारे यांनी या मेळाव्यात शेतकऱ्यांना नैसर्गिक व विषमुक्त शेतीबाबत सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाची सुरुवात पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीचे HOD मकरंद पाठक, रोल शॉप सेक्शनचे टीम लीडर मनीष बोबडे, ग्रामसंपन्न माणगाव ॲग्रो प्रायव्हेट कंपनीच्या संचालक देविका पाबेकर, निलेश लाड आदी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सीएसआर प्रमुख कुलदीप पुरंदरे यांनी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीकडून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.कल्याणी मुरदारे यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे नैसर्गिक शेतीची कार्यपद्धती, विषमुक्त शेतीचे प्रयोग, उत्पादन व विक्री व्यवस्था याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यासोबतच गोपालन, वृक्षलागवड, शेळीपालन, कुक्कुटपालन, भाजीपाला उत्पादन आणि सेंद्रिय शेती यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांची माहिती देत त्यातील विविध संधी त्यांनी स्पष्ट केल्या.

शेती करताना उत्पादनाबरोबरच त्याचे योग्य नियोजन, बाजारपेठ आणि विक्री व्यवस्था यांनाही महत्त्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी विविध प्रश्न व शंका उपस्थित केल्या. त्यांचे समाधानही कल्याणी मुरदारे यांनी केले.

मेळाव्याच्या निमित्ताने ग्रामसंपन्न माणगाव ॲग्रो प्रायव्हेट कंपनीच्या शेतकरी सभासदांनी आपले मनोगत व्यक्त केले. पोस्को कंपनीकडून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या शेतकरी संवाद उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

मेळाव्याच्या निमित्ताने महिला बचत गट व गृहिणींनी तयार केलेल्या विविध पाककृती आणि वस्तूंचे प्रदर्शन व विक्री स्टॉलही मांडण्यात आले होते.

# रात्री घरफोड्या करणारी टोळी जेरबंद; आठ गुन्हे उघडकीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रात्रीच्या वेळी घरफोडी करून चोरी करणाऱ्या चौघांना गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्या चौकशीत नवी मुंबई, रायगड आणि ठाणे परिसरातील आठ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याच्या समांतर तपासादरम्यान ही कारवाई करण्यात आली.

तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. त्यानुसार सापळा रचून लहू सुबराव पवार (४०), सचिन शहाजी पवार (२२), अंकुश सुबराव पवार (३४) आणि शहाजी सुबराव पवार (५०) या चौघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या तपासानुसार या आरोपींनी वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या साथीदारांच्या मदतीने घरफोडीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामध्ये तळोजा, पनवेल तालुका, पनवेल शहर, खोपोली आणि कळवा पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार तळोजा पोलीस ठाणे, पनवेल तालुका पोलीस ठाणे, पनवेल शहर पोलीस ठाणे, खोपोली पोलीस ठाणे आणि कळवा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एकूण आठ गुन्ह्यांचा तपास या कारवाईत उघडकीस आला आहे.




यातील काही गुन्ह्यांमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) आदी कलमांनुसार गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, आरोपी अंकुश सुबराव पवार हा यापूर्वीही नेरुळ, खारघर, सीबीडी बेलापूर आणि भायखळा पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ताब्यात घेतलेल्या चौघांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी त्यांना तळोजा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# पनवेलमध्ये प्रतिबंधित गुटखा-तंबाखू जप्त

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील बावन्न बंगला परिसरातील मेहेर लॉन्सजवळ प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाल्याचा साठा बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी मोहसिन माजिद शेख (३०) याला अटक केली. ही कारवाई २६ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार मेहेर लॉन्सशेजारील रस्त्यावर मोहसिन शेख हा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाला बाळगताना आढळून आला. त्याच्याकडून विविध प्रकारचे तंबाखू व पानमसाल्याचे पाऊच तसेच एक बजाज कंपनीची रिक्षा असा एकूण दोन लाख ४७ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालामध्ये वि-१ बिग तंबाखूचे पाऊच, केसरयुक्त विमल पानमसाल्याचे पाऊच तसेच वि-१ तंबाखूचे पाऊच यांचा समावेश आहे. यासोबतच काळ्या-पिवळ्या रंगाची बजाज ऑटो रिक्षा (एमएच ४६ एसी १७९६) पोलिसांनी ताब्यात घेतली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अजित बिरादार करीत आहेत.

# ११ लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल** : नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ११ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात २५ सप्टेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला. योगेश सोनवणे खारघर, सेक्टर १२ येथे राहत असून त्यांच्या मोबाइलवर शेअर मार्केटमधील व्हॉट्सअप ग्रुपच्या माध्यमातून बीटीएसटी प्लॅन गुंतवणूक व आयपीओमधून नफा मिळवण्याचे आमिष दाखवण्यात आले. समोरील इसमांनी पिडी एंटरप्राइजेस बँक खात्यावर त्यांच्याकडून ११ लाख रुपये घेतले आणि विनापरवाना शेअर अलर्ट केल्याचे सांगून लिंकद्वारे आणखी ३० लाख रुपये भरण्याची मागणी केली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सोनवणे यांनी तक्रार दाखल केली.

# पोस्टल कर्मचाऱ्यांचे संयुक्त द्विवार्षिक अधिवेशन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात नॅशनल युनियन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज (FNPO) अंतर्गत पोस्टमन, एमटीएस व जीडीएस संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संयुक्त द्विवार्षिक अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. यावेळी पोस्टल विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.




नवी मुंबई विभागातील पोस्टल कर्मचारी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अधिवेशनाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, एफएनपीओचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा जनरल सेक्रेटरी निसारभाई जुनजावर, उपविभागीय अधीक्षक अनिता कुमारी मंडल, नॅपे नवी दिल्लीचे अध्यक्ष संतोष कदम आणि सर्व्हिसेस म्युनिसिपल एम्प्लॉईज महाराष्ट्रचे अनिल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, डिजिटल युगात विविध माध्यमे उपलब्ध झाली असली तरी शासकीय, कायदेशीर आणि अधिकृत पत्रव्यवहारामध्ये भारतीय टपाल विभागाचे स्थान आजही कोणी हिरावून घेऊ शकत नाही. देशाच्या कानाकोपऱ्यात सेवा पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पोस्टल कर्मचारी करीत आहेत.

महापौर नितीन पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. अधिवेशनात कर्मचारी कल्याण, सेवासुविधा, पदोन्नती, कामकाजातील आव्हाने आणि संघटनात्मक बळकटी यासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. नवी मुंबई विभागातील पोस्टल कर्मचारी मोठ्या संख्येने अधिवेशनात सहभागी झाले होते.

# खिशातून चार हजार रुपये काढून लुटले

**नवीन पनवेल** : पिस्तूलचा धाक दाखवून ३२ वर्षीय चालकाच्या खिशातील चार हजार रुपये जबरदस्तीने काढून नेल्याप्रकरणी एकाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २६ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मारुती वसंत शिंदे हे सेक्टर २, ई, कळंबोली येथे राहत असून आरोपीने त्यांना रॅपिडो कंपनीच्या अ‍ॅप्लीकेशनवरून संपर्क केला आणि पुणे ते सीबीडी जाण्यासाठी कार भाड्याने घेऊन त्यातून जात असताना सव्वादोनच्या सुमारास पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवरील खालापूर टोल नाका आणि पहिला बोगदा क्रॉस केल्यानंतर काही अंतरावर असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा खांब गेल्यानंतर आरोपीने गाडी रस्त्याच्या कडेला उभी करण्यास सांगितली आणि त्याच्या कमरेला लावलेले पिस्तूल काढून मारुती शिंदे यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूला पिस्तूल लावली. पिस्तूलचा धाक दाखवून त्यांच्या पॅन्टच्या खिशातील चार हजार रुपये काढून घेतले.

# इमारतीच्या मीटर बॉक्सला आग

**पनवेल : वार्ताहर**

गावदेवी मंदिरामागील बाजूस उत्कर्ष दवाखान्याशेजारी असलेल्या सदन इमारतीतील मीटर बॉक्सला दुपारी १ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. मीटर बॉक्समधून धूर व आगीच्या ज्वाळा निघू लागल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीची माहिती मिळताच पनवेल अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन जवानांनी तत्परतेने आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेत मीटर बॉक्स आणि विद्युत वायरिंगचे काही प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच महावितरणचे कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाले. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून नुकसान झालेल्या वायरिंगची तपासणी व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

# ५० हजारांच्या मटेरियलची चोरी

**नवीन पनवेल** : अज्ञाताने ५० हजारांच्या मटेरियलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २५ सप्टेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला. मारुती उदगीरे रिमेल्टेड लीड हे मटेरियल ट्रकने पालघर येथून घेऊन जात होते. पहाटे मुंबई-पुणे हायवे लेनला आळंदी पुणेकडे जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनावरील इसमाने ५० हजार रुपये किमतीचे रिमेल्टेड लीड चोरून नेले.

# ओरायन मॉलमध्ये मोदक स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल येथील ओरायन मॉलमध्ये आयोजित 'मॅड ओव्हर मोदक' या विशेष मोदक बनवण्याच्या स्पर्धेत स्पर्धकांनी पाककौशल्यासोबतच सर्जनशीलतेचे अनोखे दर्शन घडवले. विविध आकार, रंग, सजावट आणि चवींच्या मोदकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, असे प्रतिपादन सिनेअभिनेत्री धनश्री कडगावकर यांनी केले.




गणेशोत्सव आणि मोदक यांचे अतूट नाते लक्षात घेऊन आयोजित या स्पर्धेत पारंपरिक उकडीच्या मोदकांपासून ते आकर्षक पद्धतीने सजवलेल्या नाविन्यपूर्ण मोदकांपर्यंत विविध प्रकार पाहायला मिळाले. प्रत्येक स्पर्धकाने मोदकाची चव, आकारमान, सजावट आणि सादरीकरण यामध्ये वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्पर्धेच्या ठिकाणी जणू मोदकांच्या रूपात कल्पकतेचीच मेजवानी पाहायला मिळाली. स्पर्धेत वैष्णवी कोचरेकर यांनी प्रथम क्रमांक, शर्वरी सुतार यांनी द्वितीय क्रमांक, तर अंकिता देसाई यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याबरोबरच गणेशोत्सवातील पारंपरिक खाद्यसंस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रमाला अभिनेत्री आणि विशेष अतिथी धनश्री कडगावकर यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली. त्यांनी स्पर्धकांच्या कलाकृतींची पाहणी करून त्यांच्या पाककौशल्याचे कौतुक केले. नागरिकांनीही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद देत स्पर्धकांचा उत्साह वाढवला.

गृहिणी व पाककलेची आवड असलेल्या नागरिकांना स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले. एम. पी. ग्रुप व ओरायन मॉल, पनवेल यांच्या सहकार्याने आयोजित उपक्रमामागे गणेशोत्सवाचा उत्साह, पारंपरिक खाद्यसंस्कृती व नागरिकांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याचा उद्देश होता. मोदक या पारंपरिक पदार्थाभोवती स्पर्धेची संकल्पना उभी करून मनोरंजनाची जोड देण्यात आली. सहभागींसोबतच उपस्थित नागरिकांनाही या उपक्रमाचा आनंद घेता आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मॉलचे सेंटर हेड अग्नेलो फर्नांडिस, ऑपरेशन्स हेड सारिका हजारे आणि मार्केटिंग मॅनेजर श्रीयश्री नाईक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्पर्धेचे नियोजन, सहभागींची व्यवस्था, कार्यक्रमाचे सादरीकरण आणि नागरिकांचा सहभाग यासाठी टीमने विशेष मेहनत घेतली. मॉलचे मालक मंगेश परुळेकर आणि मनन परुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

# कामोठ्यात आज स्वतंत्र वीजवाहिनीचे भूमिपूजन

**पनवेल** : जव्हार सहकारी औद्योगिक वसाहत, कामोठे येथे उद्योगांना अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या स्वतंत्र औद्योगिक वीजवाहिनीचे भूमिपूजन सोमवारी (दि. २८) सकाळी ११.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, उद्योग व सेवा विभागाचे संयुक्त आयुक्त संदीप पाटील, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, उद्योग व सेवा विभागाचे सहाय्यक आयुक्त जी. एस. हरळ्या आणि महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना सातत्यपूर्ण वीजपुरवठा मिळावा आणि वीजपुरवठ्यातील व्यत्यय कमी व्हावा या उद्देशाने स्वतंत्र वीजवाहिनी उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे औद्योगिक वसाहतीतील वीजपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. भूमिपूजन सोहळा जव्हार सहकारी औद्योगिक वसाहतीच्या संस्थेच्या कार्यालयात होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष स्वप्निल गुप्ते यांनी दिली आहे.

# गव्हाण विद्यालयाच्या अनुज पाटीलचे बुद्धिबळ स्पर्धेत सुयश

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथील विद्यार्थ्यांनी पावसाळी क्रीडा स्पर्धांमध्ये विजयाची घोडदौड कायम ठेवत विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले. याच मालिकेत विद्यालयाच्या अनुज पाटीलने बुद्धिबळ स्पर्धेतही दमदार कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



२३ सप्टेंबर रोजी कासारभट येथे झालेल्या पनवेल तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात गव्हाण विद्यालयाचा कुमार अनुज पाटीलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे अनुजची आगामी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अनुज पाटीलला विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभत आहे. कासारभट येथे झालेल्या स्पर्धेसाठी उपशिक्षिका प्रतिज्ञा घरत यांनी विद्यार्थ्यांसोबत उपस्थित राहून त्यांचे मनोबल वाढविले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांनी खेळाडूंना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी प्रेरित केले.

अनुजच्या यशाबद्दल प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. पालकवर्गातूनही अनुजच्या यशाचे कौतुक होत आहे. पावसाळी क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत गुणवत्ता सिद्ध केली असून बुद्धिबळातील या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा यशाची परंपरा अधिक समृद्ध झाली आहे. आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेतही अनुज पाटील उत्तम कामगिरी करून विद्यालयाचे नाव उंचावेल, असा विश्वास विद्यालय परिवाराने व्यक्त केला आहे.

# 'सीकेटी'च्या कुस्तीपटूंची जिल्हास्तरीय फ्री-स्टाइल स्पर्धेत चमक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने २३ सप्टेंबर रोजी प. जो. म्हात्रे विद्यालय नावडे येथे आयोजित जिल्हास्तरीय फ्री-स्टाइल कुस्ती स्पर्धेमध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयातील ओम योगेश पाटील (११वी कॉमर्स) याने द्वितीय, तर श्लोक राम पाटील (११वी कॉमर्स) व स्वराज गायकर (११वी कॉमर्स) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

फ्री-स्टाइल कुस्ती स्पर्धेत क्रीडापटूंनी मिळवलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# करंजाडे-वडघरमध्ये नशेबाजांवर कारवाईची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे-वडघर परिसरातील शाळा, महाविद्यालये, स्मशानभूमी आणि मोकळ्या जागांमध्ये दारू व अमली पदार्थांचे सेवन तसेच जुगाराचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. या प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई करावी आणि संवेदनशील ठिकाणी पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी करंजाडे पोलीस पाटील कुणाल लोंढे यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले आहे. सिडकोने विकसित केलेल्या करंजाडे-वडघर नोडमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आहेत. परिसरात शाळा, महाविद्यालये तसेच रहिवासी भाग असल्याने महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. करंजाडे बौद्धवाडा स्मशानभूमी, कोठारी स्कूलसमोरील मैदान, टाटा पॉवर सेक्टर ४लगत साई मंदिर परिसर, टाटा पॉवर कॅम्प सेक्टर १, वडघर मराठी शाळेमागील परिसर, कब्रस्तान आणि वडघर स्मशानभूमी या ठिकाणी विशेष लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या ठिकाणी दारू व अमली पदार्थांचे सेवन, जुगार तसेच अन्य गैरप्रकार करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी तसेच अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी नियमित पोलीस गस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## संपादकीय

# बळीराजाला दिलासा

राज्य सरकारने राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून संकटात सापडलेल्या बळीराजाला सरसकट मदत देण्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाने थेट शेताच्या बांधावर जाऊन घेतलेला आढावा हा केवळ प्रशासकीय सोपस्कार नसून संकटात होरपळणाऱ्या शेतकऱ्याला दिलासा देणारे एक संवेदनशील आणि आश्वासक पाऊल ठरले आहे.

**निसर्गाचा लहरीपणा आणि पावसाने दिलेली ओढ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला होता. अशा अत्यंत कठीण आणि संवेदनशील परिस्थितीत राज्य सरकारने अत्यंत तत्परतेने पावले उचलत कोरडा दुष्काळ जाहीर केला. केवळ घोषणेपुरते मर्यादित न राहता मुख्यमंत्र्यांनी 'सरसकट मदत' देण्याची दिलेली ग्वाही ही शेतकऱ्यांच्या मनातील भीती दूर करणारी ठरली आहे. जेव्हा राज्यप्रमुख स्वतः पुढे येऊन संकटग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो, तेव्हा प्रशासनालाही एक नवी गती आणि दिशा मिळते हेच या निर्णयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. सध्याच्या काळात सर्वात महत्त्वाची आणि कौतुकास्पद बाब म्हणजे प्रत्यक्ष कृतीची गती. दुष्काळाची घोषणा होताच तातडीने पाहणी, पंचनामे आणि प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सहसा सरकारी मदतीची प्रक्रिया ही लालफितीच्या कारभारात अडकते असा आजवरचा अनुभव राहिला आहे, परंतु या सरकारने ही परंपरा मोडीत काढल्याचे चित्र आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून आणि पारदर्शक पद्धतीने पंचनामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून खरी मदत योग्य वेळेत प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बँक खात्यात पोहचू शकेल. वेळेत मिळालेली मदत हीच शेतकऱ्याला पुढील हंगामासाठी उभारी देण्यास सक्षम ठरत असते. या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वात दिलासादायक बाजू म्हणजे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्यातील विविध मंत्र्यांचा थेट शेताच्या बांधावर सुरू असलेला दौरा. वातानुकूलित दालनांमधून किंवा केवळ कागदी अहवालांवरून परिस्थितीचे मूल्यमापन न करता शासन थेट मातीशी आणि माणसांशी जोडले गेले आहे. राज्याचे नेतृत्व जेव्हा स्वतः चिखल तुडवत, पिकांची दुरवस्था डोळ्यांनी पाहत शेतकऱ्यांच्या खांद्यावर हात ठेवते, तेव्हा तो केवळ संवाद राहत नाही, तर ते बळीराजाला जगण्याचे बळ देणारे एक भावनिक आणि नैतिक अधिष्ठान बनते. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांशी साधलेला हा थेट संवाद त्यांच्यातील नैराश्य दूर करून एक नवा आत्मविश्वास निर्माण करीत आहे. दुष्काळ हा केवळ एका वर्षाचा नसतो, त्याचे आर्थिक आणि सामाजिक परिणाम दीर्घकालीन असतात. हे ओळखूनच केवळ तात्पुरती आर्थिक मदत न देता शेतकऱ्यांना शाश्वत आधार देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सरसकट मदतीमुळे कोणताही शेतकरी तांत्रिक कारणास्तव मदतीपासून वंचित राहणार नाही याची खात्री मिळाली आहे. याशिवाय जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची सोय आणि कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत मिळणारी सूट यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला लागलेली गळती रोखण्यास मोठी मदत होणार आहे. संकट मोठे असले तरी सरकारच्या तत्पर भूमिकेमुळे या संकटावर मात करणे शक्य आहे हा विश्वास आज गावशिवारात पाहायला मिळत आहे. एकंदरीत राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय आणि सुरू असलेली गतिमान कार्यवाही ही कल्याणकारी राज्याची संकल्पना स्पष्ट करणारी आहे. जेव्हा सरकार आणि शेतकरी यांच्यात असा थेट आणि जिव्हाळ्याचा संवाद असतो, तेव्हा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीचा सामना धैर्याने करता येतो. शासनाचे हे पाऊल नक्कीच अभिनंदनीय आणि स्वागतार्ह आहे.**

# माहितीचा अधिकार : पारदर्शकतेचे प्रभावी शस्त्र

आपल्या देशातील नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्वात महत्त्वाच्या कायद्यांपैकी एक म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५. या लक्षवेधी कायद्याविषयी जनजागृतीसाठी २८ सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अमलात आल्यापासून मूलभूत मानवाधिकाराला महत्त्व प्राप्त झाले आणि पारदर्शकतेचे नवे पर्व सुरू झाले. या कायद्याला आता २१ वर्षे पूर्ण झाली असून विकास प्रक्रियेत तो आजही अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी भूमिका बजावत आहे.




सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये 'फ्रीडम ऑफ प्रेस ॲक्ट' पारित करून माहितीचा अधिकार मान्य करण्यात आला. त्यानंतर अमेरिका, डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, फ्रान्स, कॅनडा, स्पेन, जपान या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. संयुक्त राष्ट्रसंघानेही १९४८ च्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात 'युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राइट्स'ची घोषणा करून नागरिकांना माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असल्याचे संमत केले.या अधिकाराने जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरू केले आणि खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळाली. त्याचाच एक भाग म्हणून २८ सप्टेंबर २००२ मध्ये बल्गेरियामध्ये 'फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन नेटवर्क' या नावाने संघटना व कृती गटांचे नवे संघटन जाळे उभारण्यात आले.तेव्हापासून जगभर माहिती अधिकाराची जागृती वाढावी, या कायद्याच्या अंमलबजावणीतून पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती गतिमान व्हावी आणि खुल्या शासन व्यवस्थेसाठीची बांधिलकी व्यक्त व्हावी, यासाठी २८ सप्टेंबर हा 'जागतिक माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला.

महाराष्ट्र शासनानेही २० सप्टेंबर २००८ च्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस 'माहिती अधिकार दिवस' म्हणून घोषित केला असून या दिवशी व्यापक प्रमाणात जनजागृती उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९(१)(क) मधील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यातच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी विविध न्यायनिवाड्यांत व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली आणि १२ ऑक्टोबर २००५ पासून जम्मू-काश्मीर वगळता संपूर्ण भारतात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली.केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा, तर ३ राज्यांनी त्यासंबंधीची विधेयके तयार करण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरीक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला.




ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनामुळे तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. नागरिकांना आवश्यक माहिती पुरवणे, प्रशासनात शिस्त निर्माण करून अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेच्या व्यवहारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन करणे आणि शासकीय कामे विनाविलंब व सहजगत्या व्हावीत, यासाठी या कायद्याची निर्मिती झाली. इतर कायदे जनतेने पाळावेत या अपेक्षेने तयार करण्यात आले होते, तर माहितीच्या अधिकारामुळे सर्वसामान्य नागरिकाला संसद सदस्याच्या बरोबरीने माहिती मिळवण्याचा अधिकार मिळाला आहे.

प्रशासकीय अधिकारी व सार्वजनिक प्राधिकरणे आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही, हे आता सामान्य व्यक्ती पाहू शकते. माहिती मागणाऱ्या व्यक्तीला ठराविक कालावधीत माहिती देणे सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक असल्यामुळे शासकीय कारभार अधिक पारदर्शक बनतो, भ्रष्टाचार कमी होतो आणि राज्यकारभार जनताभिमुख होतो, हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.कोणत्याही भारतीय नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, हे सांगणे बंधनकारक नाही. साध्या अर्जासह दहा रुपये शुल्क आकारले जाते. जीवित व स्वातंत्र्यासंबंधीची माहिती ४८ तासांत देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण माहितीसाठी ३० दिवस, सहायक माहिती अधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अर्जासाठी ३५ दिवस, तर त्रयस्थ व्यक्तीचा संबंध असल्यास ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.विहित मुदतीत माहिती न मिळाल्यास किंवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास ३० दिवसांत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे अपील करता येते.

तेथेही समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे दुसरे अपील करता येते. गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना तसेच मानवी हक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित काही माहिती देता येत नाही.जिल्हा किंवा तालुकास्तरावर जन माहिती अधिकारी म्हणून वेगळे कार्यालय नाही. प्रत्येक शासकीय कार्यालयात जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करण्यात आले आहेत. संबंधित कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करावा लागतो. प्रथम अपिलीय अधिकारी हा संबंधित कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाचा अधिकारी असतो. द्वितीय अपिलासाठी बृहन्मुंबई, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती या विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी आयोगाची खंडपीठे स्थापन करण्यात आली आहेत.

माहिती आयुक्तांचा निर्णय अंतिम असतो.अर्ज दाखल करताना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन योग्य रीतीने मांडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रश्नार्थक स्वरूपाची, कारणे विचारणारी किंवा गैरसमज निर्माण करणारी माहिती मागितल्यास अर्ज फेटाळला जाण्याची शक्यता असते. एका अर्जात एका विषयाशी संबंधितच माहिती विचारावी. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ५० पृष्ठांपर्यंतची माहिती मोफत दिली जाते.महाराष्ट्र शासनाने ई-गव्हर्नन्सला नेहमीच महत्त्व दिले आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून माहिती मिळवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी www.rtionline.maharashtra.gov.in हे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंमलात आल्यापासून त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढतच असून महाराष्ट्र या कायद्याचा वापर करण्यात देशात अव्वल आहे.

देशातील अनेक घोटाळे उघडकीस आणण्यामागचा शिल्पकार हा माहिती अधिकार कायदा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी माहितीचा अधिकार हे एक प्रभावी शस्त्र असून त्याचा योग्य वापर व्हावा, हीच अपेक्षा आहे.

**-अनिल आलुरकर,**
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती



## बदलते तंत्रज्ञान

# ...तर कार, बाईकचा टायर चालेल दीर्घकाळ



कार आणि बाईकचा टायर दीर्घकाळ टिकवण्यासाठी कार असो किंवा बाईक टायरची विशेष काळजी घेणे खूप आवश्यक आहे. कार किंवा बाईकचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे टायर. अशा परिस्थितीत टायर मॉनिटरिंग करणे आणि टायरचे आयुष्य वाढवणे खूप महत्त्वाचे आहे.

टायरचे आयुष्य वाढवायचे असेल तर कार किंवा बाईकस्वाराने काही गोष्टींची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. कारच्या टायरची जितकी चांगली काळजी घेतली जाईल तितका कारचा टायर चांगला परफॉर्म करेल. आज आम्ही तुम्हाला अशाच काही टिप्स सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमच्या वाहनाची विशेष काळजी घेऊ शकता.

तुमच्या कारचा टायर किती काळ टिकेल हे तुमच्या टायरच्या हवेच्या दाबावर अवलंबून असते. टायरमध्ये हवा पूर्ण भरली नसेल तर त्यावर जास्त दाब येतो आणि तो लवकर खराब होतो. अशा स्थितीत गाडीचे टायर वेळोवेळी तपासा, जेणेकरून टायर झिजणार नाहीत. तसेच जर तुम्ही तुमच्या टायरमध्ये सामान्य गॅसऐवजी नायट्रोजन गॅस भरला तर टायरचे आयुष्य वाढेल. नायट्रोजन वायू सामान्य वायूपेक्षा खूप चांगला असतो. यामध्ये टायर ओलसर होण्याची शक्यता कमी असते. वाटेत टायर पंक्चर झाल्यास तो दुरुस्त करण्याऐवजी टायर सीलंट वापरा. असे केल्याने हवेचा दाबही कमी होत नाही. तुम्ही लांबच्या प्रवासाला जात असाल तर टायर सीलंट हा नेहमीच चांगला पर्याय आहे.

खराब रस्त्यावर गाडी चालवल्यामुळे गाडीच्या चाकांमध्ये चाकांचे असंतुलन किंवा अलाइनमेंटसारख्या समस्या उद्भवतात, त्यामुळे कारचे टायर लवकर झिजू लागतात आणि कारचे मायलेज कमी होऊ लागते. कार चालवताना प्रत्येक १०,००० किलोमीटर अंतरावर व्हील अलाइनमेंट करणे आवश्यक आहे.वाहन खरेदी केल्यानंतर बरेच लोक टायर वेगळे करून त्यात बदल करून घेतात. अनेकदा असे टायर गाडीच्या मूळ टायरच्या तुलनेत आकाराने लहान किंवा मोठी असतात. असे टायर बसवल्याने वाहनाच्या मायलेज आणि इंजिनवर निश्चितच परिणाम होतो. याशिवाय ते टायरदेखील लवकर खराब होतात, ज्यामुळे तुम्हाला आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. बाईक-कारचे टायर फक्त ४० हजार किलोमीटर टिकतात, त्यानंतर ते बदलावे.

# क्रांतिकारक शहीद भगत सिंग



## निमित्त

देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत-हसत प्राणांचे बलिदान देणाऱ्या आणि अनेक पिढ्यांना प्रेरणादायी असे जीवन जगलेले क्रांतिकारक शहीद भगत सिंग यांची आज (२८ सप्टेंबर) जयंती. भगत सिंग म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामतील एक त्सुनामी होती. या वादळाने ब्रिटिश राजवटीला सळो की पळो करून सोडले होते, तर दुसरीकडे देशाच्या स्वातंत्र्यासाठी वेगवेगळ्या लढणाऱ्या संस्था, संघटना व व्यक्तींना एकत्र आणण्याचे काम केले. भगत सिंग यांच्या जहाल विचारांमुळे भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कमालीचा वेग आला. आजही प्रत्येक भारतीय त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेतो. भारतमातेच्या या थोर सुपुत्राची जयंती देशभरात अत्यंत उत्साहात साजरी केली जाते.

भगत सिंग यांचा जन्म सध्या पाकिस्तानचा भाग असलेल्या पंजाब प्रांतातील लायपूर जिल्ह्यातील बंगा इथे २८ सप्टेंबर १९०७ रोजी वडील किशन सिंह आणि आई विद्यावती यांच्या पोटी झाला. आजीने त्यांचे नाव भगानवाला (एक भाग्यवान) ठेवले. पुढे ते भगत सिंग म्हणून ओळखले जाऊ लागले.

भगत सिंग यांना देशसेवेचा वारसा घरातूनच मिळाला होता. त्यांचे वडील किशन सिंग, काका अजित सिंग आणि स्वरण सिंग हे स्वातंत्र्यसैनिक होते. भगत सिंग यांनी लाहोरच्या डीएव्ही हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. १९१९मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरू झाली, तेव्हा भगत सिंग सातवीत शिकत होते, मात्र त्यांना देशाचे स्वातंत्र्यलढा खुणावत होता. अखेर वयाच्या १५व्या वर्षी त्यांनी आपल्या परीनं यात खारीचा वाटा उचलायला सुरुवात केली. गुप्त क्रांतिकारी कार्यात भाग घ्यायला सुरुवात केली.

१३ एप्रिल १९१९ रोजी बैसाखी सणाच्या दिवशी रौलेट कायद्याच्या निषेधार्थ जालियनवाला बागेत एक जनसभा झाली. ब्रिटिश जनरल डायरच्या क्रूर आणि जाचक आदेशामुळे ब्रिटिश सैनिकांनी नि:शस्त्र लोकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या अत्याचारामुळं देशभरात क्रांतीची ज्वाळा अधिकच भडकली. या हत्याकांडाचा १२ वर्षांच्या भगत सिंग यांच्या मनावर मोठा परिणाम झाला. जालियनवाला बागेतील रक्ताने लाल झालेल्या मातीवर त्यांनी इंग्रजांच्या विरोधात प्रखर लढा उभारण्याची शपथ घेतली. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण थांबवून त्यांनी 'नौजवान भारत सभा' या संघटनेची स्थापना केली.

सुखदेव आणि राजगुरू यांच्यासोबत भगतसिंग यांनी काकोरी प्रकरण घडवून आणले. भगतसिंग यांनी राजगुरूंसोबत १७ डिसेंबर १९२८रोजी लाहोरमध्ये सहाय्यक पोलीस अधीक्षक असलेले ब्रिटिश अधिकारी जेपी साँडर्स यांची हत्या केली होती. चंद्रशेखर आझाद यांनी त्यांना यात पूर्ण मदत केली होती.

भगत सिंग यांनी बटुकेश्वर दत्त यांच्यासोबत ८ एप्रिल १९२९ रोजी दिल्लीतील अलिपूर रोड येथील तत्कालीन सेंट्रल असेंब्ली ऑफ ब्रिटिश इंडियाच्या सभागृहात बॉम्ब आणि पॅम्प्लेट फेकले. या घटनेने ब्रिटिश सरकार हादरून गेले आणि देशात भगत सिंग यांचा बोलबाला झाला.

'इन्कलाब झिंदाबाद' ही भगत सिंग यांची घोषणा खूप प्रसिद्ध झाली. त्याचा उल्लेख ते करीत असत. त्यांना ७ ऑक्टोबर १९३० रोजी फाशीची शिक्षा सुनावली गेली. ते धीरोदत्तपणे या शिक्षेला सामोरे गेले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चिकन-मटनपेक्षा 'या' ड्राय फ्रूटमध्ये जास्त व्हिटॅमिन

व्हिटॅमिन बी १२ शरीरासाठी महत्त्वाचे असते. शाकाहारी लोकांमध्ये त्यांची कमतरता असते. व्हिटॅमिन बी १२ हे मांसाहारी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात आढळते, परंतु काही ड्रायफ्रुट्समध्येही याचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन बी १२च्या कमतरतेमुळे शरीर कमकुवत होऊ शकते. व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्त्रोत कोणते ड्राय फ्रूट आहेत ते जाणून घ्या.



मनुका म्हणजे किसमिस. हेसुद्धा व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्त्रोत आहेत. रात्री मनुका भिजवून सकाळी त्या खाल्ल्यामुळे त्याचा चांगला फायदा होतो. किसमिस इतर ड्राट फ्रूटच्या तुलनेत स्वस्तसुद्धा असतात. मनुका खाल्ल्यामुळे हाडे अधिक मजबूत होतात.

खजूरमध्ये नैसर्गिक गोडवा असतो. हा पदार्थ चविष्टसुद्धा आहे. यामध्ये व्हिटॅमिन बी १२देखील चांगले असते आणि विविध पदार्थांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. उपवास असताना अनेक वेळा खजूरचे सेवन केले जाते. खजूर खाल्ल्यामुळे मेंद अधिक तल्लख होतो.

काजू हे व्हिटॅमिन बी १२चे मौल्यवान स्त्रोत आहेत. हे बऱ्याचदा स्नॅक म्हणून खाल्ले जातात. तसेच विविध पदार्थांमध्ये त्याचा वापर केला जातो. काजूचा वापर केल्यामुळे तुमचा आहार एक स्वादिष्ट आणि पौष्टिकसुद्धा होतो.


पिस्ता केवळ स्वादिष्टच नाहीत तर त्यामध्ये व्हिटॅमिन बी १२चे प्रमाणदेखील चांगले आहे. ते स्नॅक म्हणून, सॅलड टॉपिंग म्हणून किंवा दही किंवा डेझर्टमध्ये मिसळून खाल्ले जाऊ शकतात. पिस्तामध्ये फाइबर मुबलक प्रमाणात असते.

बदामात व्हिटॅमिन बी १२च्या लक्षणीय आहे. बदाम खाण्याचे अनेक फायदे आरोग्याला होतात. नास्तामध्ये किंवा सॅलड्स, दही किंवा मिष्टान्नमध्ये बदाम टाकून खातात. भारतात बदामाचे उत्पादन पुरेसे नसल्याने त्याची अफगाणिस्तान व इराण येथून आयात होते.

भोपळ्याच्या बियांमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ असते, तसेच इतर आवश्यक पोषक तत्वांचा त्यामध्ये समावेश असतो. आपल्या रोजच्या आहारात भोपळ्याच्या बियांचा समावेश करा किंवा स्नॅक म्हणून खा. याशिवाय सूर्यफुलाच्या बिया, अंजीर, अक्रोड यामध्येही बी १२ असते. अशा प्रकारे हे पदार्थ खाल्ल्यास व्हिटॅमिन बी १२ची शरीरातील गरज आपण भरून काढू शकतो.

# खोपोली रेल्वेस्थानकात समस्या; फलाटावरुन बाहेर पडण्यासाठी एकच मार्ग, प्रवाशांची घुसमट

**खोपोली : प्रतिनिधी**





खोपोली रेल्वे स्थानकावर ना पादचारी पूल, ना विस्तिर्ण फलाट, स्थानकातून बाहेर पडण्यासाठी प्रवाशांना अरुंद बोळातून जावे लागत असल्याने या स्थानकांवर परेल स्थानकावर घडलेल्या चेंगराचेंगरीची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

खोपोलीचे वाढते नागरीकरण, निसर्गरम्य ठिकाण, प्रसिद्ध धबधबे, गगनगिरी महाराज आश्रम, जागतिक दर्जाचे ऍडलॅब इमाजिका थिमपार्क, बोरघाटातील मोहक दृश्य तसेच अलिबाग, पेण, पाली, सुधागड तर कधी कधी खंडाळा लोणावळा सफर खोपोलीतून केली जात असल्याने शनिवार,रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी खोपोली फलाटावर तुफान गर्दी उसळत असते. खोपोली रेल्वे स्थानकावर एकच फलाट असल्याने मध्य रेल्वेच्या मुंबईतील परळ स्थानकावर चेंगराचेंगरीची घटना घडली होती ती घटना पुन्हा मध्य रेल्वेच्या खोपोली फलाटावर घडल्यानंतर रेल्वे प्रशासन जागे होईल का असा सवाल प्रवासी करीत आहेत.

तसेच खोपोलीत नागरिकांची आणि प्रवाशांची मोठया प्रमाणात गर्दी वाढताना आहे. सकाळ व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत रेल्वे स्थानकावाहेरील रस्त्यावर प्रवाशांची मोठी वर्दळ निर्माण होत असल्याने वाहतूक कोंडीसोबतच पादचाऱ्यांनाही मोठया अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानक परिसरातील अरुंद रस्ता त्यातच पावसाळ्यात रस्त्यावर डबके,पाणी व अस्वच्छतेमुळे गर्दीच्या वेळी नागरिकांना रस्तयावरुन ये-जा करणे कठीण होते.

स्थानकावर येणाच्या-जाणाच्या प्रवाशांची संख्या लक्षात घेता स्थानक परिसरातील रस्ता रुंद करणे, पादचारी मार्गाची व्यवस्था करणे आणि वाहतूक नियोजन सुधारणे गरजेचे झाले आहे.गर्दीच्या वेळेन वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना तसेच अतिक्रमणावर कारवाई होणे आवश्यक आहे.

खोपोली शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढतअसताना रेल्वे स्थानक परिसरातील पायाभूत सुविधांचा अभाव आहे भविष्यात गर्दी आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नियोजन करणे गरजेचे असल्याचे प्रवासी संघटनेची मागणी आहे.

दरम्यान मध्य रेल्वेच्या प्रशासनाने आधुनिकीकरणाच्या कितीही गप्पा मारल्या, सरकत्या जिने फलाटावर लावले असले तरीही मध्य रेल्वेचे केळवी डोळवली लौजी येथिल रेल्वे फलाटावर भटके कुत्रे, गुरा ढोरांचा वावर असतानाच केलवली डोळवली रेल्वे स्थानक फलाटावर पावसाच्या पाण्याने शेवाळ आले असल्याने फलाटाला घसरगुंडीचे स्वरुप आले. प्रवासी शाळकरी मुले यांच्यासह लहान मुले घसरुन पडत आहेत.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १३३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई केली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून १,३६,५०० रुपये दंड आकारला आहे.

## माणगाव बसस्थानकातून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोघांना अटक

**माणगाव : बातमीदार**

माणगाव बसस्थानकातून महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने चोरी करून पसार झालेल्या दोन संशयित आरोपींना माणगाव पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या तपासात आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे गंठन असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

माणगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारदार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणपती सणानिमित्त तक्रारदार महिला साधना राज बगडे आपल्या आईसोबत मुळ गावी जाण्यासाठी माणगाव बसस्थानकात आल्या होत्या. बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्समधील सुमारे ९ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी केले.

तक्रार प्राप्त होताच माणगाव पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला. आरोपींचे रेकॉर्ड तपासून तसेच तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून माहिती मिळवून पोलिसांनी आरोपींचा माग काढला. आरोपींना माणगाव तालुका, रायगड येथून कोणगाव, भिवंडी, ठाणे परिसरापर्यंत तपास करून ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांच्या चौकशीत आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे गंठन हस्तगत करण्यात आले आहेत.या कारवाईत आरोपींकडून यापूर्वी केलेल्या इतर चोरीच्या गुन्ह्यांचीही माहिती समोर आली असून, त्याबाबत माणगाव पोलिस ठाण्यातील खालील गुन्हे उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

तसेच आरोपींनी रायगड जिल्ह्यातील महाड, दादर सागरी, कोलाड, खोपोली, दिघी सागरी, पेण, रोहा, तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पनवेल व कल्याण आदी ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शशिकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने केली. तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या सहकार्याने कांबे शाळा परिसरात हरित उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षलागवड उपक्रम उत्साहात पार पडला. शाळा परिसर अधिक हिरवाईने नटावा आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमासाठी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'नवी मुंबई यांच्या माध्यमातून राजेश खन्ना व नीता देशमुख यांच्या सौजन्याने विविध वृक्षांची रोपे मोफत उपलब्ध करून देण्यात आली. शाळेच्या हरित परिसरासाठी केलेल्या या सहकार्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धर्मेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष तृप्ती गोंधळी, पालक विनोद कुरंगळे, दिनेश राजभर, जितेंद्र जाधव, काशिनाथ म्हात्रे, सूर्यवंशी तसेच शिक्षणप्रेमी सदस्य हरिभाऊ दळवी उपस्थित होते.

वृक्षलागवडीनंतर उपस्थितांनी लागवड केलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजावे आणि त्यांच्यात निसर्गप्रेमाची भावना रुजावी, यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची गरज असल्याचे उपस्थितांनी सांगितले.या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका जागृती जीवन तेलंगे, उपशिक्षिका रजनी विनायक गायकवाड तसेच शहाजी अभिमन्यू घायतिडक यांनी सहकार्य केले.




**पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६**

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- धानसर येथील सर्व्हे नं. ३७ पासून ते मौजे- तुर्भे येथील सव्हे नं. ७४ पर्यंत २४.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार २४.०० मी. रुंद नियोजित रस्त्याने बाधित मौजे - तुर्भे येथील सर्व्हे नं. ७४/२ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्राचे व ना-बाधिव (non-Buildable) क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- तुर्भे, ता. पनवेल येथील श्री. रमेश धर्मा म्हात्रे यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील रस्त्याने बाधित व ना-बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- तुर्भे, सर्व्हे नं. ७४/२ रस्त्याने बाधित व ना-बांधिव क्षेत्र १२८०.०३४ चौ. मी

त्यास नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.स.न. ७४/४
पश्चिमेस : ला.स.न. ७४/१
दक्षिणेस : ला.स.न. ७४/३
उत्तरेस : ला.स.न. ७१

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**सही-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

**जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/**
**२६-२६/६०१ /२०२६**
**दिनांक : २४/०९/२०२६**

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.


# माणगावच्या द.ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**




माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव, रायगड येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दिनांक २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात संपन्न झाला.

महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रगीत आणि समाजसेवा, देशसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारे उठे समाज के लिए उठे हे लक्ष्यगीत सादर करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील सभागृहांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच राज्यगीताने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुष्मिता म्हामुणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अर्सलान खान, आकांक्षा मौले या विद्यार्थ्यांनी आपले राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झाल्यानंतरचे अनुभव कथन केले. त्यानंतर कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. राजेंद्र आचार्य यांनी राष्ट्रीय सेवा योजनाचा 'प्रवास आणि महत्त्व' याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एन एस एसचे माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. के. सिनगारे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. एन एस एस मुळेच नेतृत्व गुण, व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य, सामाजिक बांधिलकी आणि कठीण प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच समाजसेवा, सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व प्रतिपादन केले. तसेच माझ्या आधी समाज, माझ्या आधी देश ही भूमिका घेऊन स्वत:साठी जगण्यापेक्षा समाजासाठी, देशासाठी कार्य करण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हेच राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्वेता सकपाळ आणि आभार प्रा.साक्षी साठे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सदस्य प्रा. स्वप्निल सकपाळ, प्रा. शाश्वती महाडिक, प्रा. प्रगती गोरेगावकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला ग्रंथपाल डॉ.संगीता उतेकर, डॉ नमिता मोरे, प्रा.जगताप बी.बी, प्रा. सत्यम वडेकर आणि विद्यार्थी बहुसंख्य उपस्थित होते.

## लोणेरे येथे उद्या रोजगार महाकुंभ महाराष्ट्र अंतर्गत भव्य मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

रोजगाराच्या संधीच्या प्रतीक्षेत असलेल्या युवक-युवतींसाठी एक महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या वतीने पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्र अंतर्गत रायगड जिल्ह्यात भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU), लोणेरे येथे आयोजित करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात एकूण ३२ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमाच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील उद्योग, कंपन्या व आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांची सांगड घालत युवकांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी मिळवून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवक-युवती, विद्यार्थी, कौशल्यप्राप्त उमेदवार तसेच रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या उमेदवारांनी या रोजगार मेळाव्यात सहभागी व्हावे. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची आणि उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत माहिती घेण्याची संधी या मेळाव्यात मिळणार आहे.'रोजगार महाकुंभ' हा केवळ रोजगार मेळावा नसून युवकांच्या करिअरला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी Job Seeker Registration करून रोजगार मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या वतीने आहे.

## सिग्मा अकॅडमी फोटोग्राफी स्पर्धेच्या वेडिंग विभागात सौरभ नाझरे प्रथम

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

हैद्राबाद फोटो ट्रेंड व सिग्मा अकॅडमी ऑफ फोटोग्राफी आयोजित वेडिंग छायाचित्र स्पर्धेत मुरूडचे सौरभ नाझरे याना वेडिंग विभागात राज्यातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याचे जाहीर झाले .स्पर्धेत हजारो फोटो सहभागी झाले होते त्यातून सौरभ चा लग्नातील विशेष फोटो निवडण्यात आले .त्याला १० हजाराचे रोख पारितोषिक व सन्मानपात्र , चषक देण्यात येणार आहे .स्पर्धेत प्रिव्हेडिंग विभागात देखील एका फोटोला पुरस्कार मिळाला आहे.



सौरभ नाझरे हा गेली १५ वर्ष व्यावसाईक फोटोग्राफी करत आहे ,वृत्तपत्रात देखील काम करत असल्याने निसर्गचित्रांसोबत लग्न समारंभात विशेष फोटोग्राफीत प्राविण्य मिळवल्याने नाविन्यपूर्ण फोटो शूट कार्यसाठी प्रसिद्ध आहे .रायगड फोटोग्राफी असोसिएशन च्या २०२३ फोटो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला होता .वडील सुधीर नाझरे यांचा पारंपरिक छायाचित्रणाचा व्यवसाय असल्याने वडिलांचे मार्गदर्शन घेऊन फोटोग्राफी क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे .यास्पर्धेचे परीक्षण जागतिक पातळीचे परीक्षक नामवंत छायाचित्रकार एम सि शेखर, जिनेश प्रसाद, अनुराग बडोळिया, चंदन सुंदर भारतातील विविध भागातून परीक्षक होते.


आदयक्रांतीवीर उमाजी नाईक नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
एल.आय.जी-१जी-६३ सेक्टर-३ पनवेल, ता. पनवेल जि. रायगड
दिनांक:- २५/०९/२०२६

जावक क्रमांक २३२१/२०२६

**कलम ८८च्या निकाला प्रमाणे व कलम ९८ व अन्वये प्राप्त प्रमाणपत्रानुसार**
**जंगम जप्ती नोटीस**
**(महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या नियम १०७अनुसार)**

वाचावे:- दि.०५/०२/२०१० रोजीच्या वसुली बाबतच्या नोटीसा.

ज्या अर्थी आदयक्रांतीवीर उमाजी नाईक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली यांनी प्रतिवादी

१. श्री. रंगनाथ सादू मदने
पत्ता- मु. पो. दुशेरे ता. कराड, जि. सातारा
२. श्री. जालिंदर बाबुराव शिंदे
पत्ता- मु. पो. नावडे ता. पनवेल, जि. रायगड
३. श्री. सुरेश बाबुराव जाधव
पत्ता- मु.पो. हनुमान म्हात्रे चाळ, मु.पो. कामोठे ता. पनवेल जि. रायगड
४. श्री. शिवाजी पांडुरंग चव्हाण
पत्ता- हनुमान म्हात्रे चाळ, मु.पो. कामोठे ता. पनवेल जि. रायगड
५. श्री. सुनिल मार्तंड पुणदिकर
पत्ता-मु.पो. दापोली पार गवळ आळी महाड
६. श्रीमती सुप्रिया सुनिल पुणदिकर
पत्ता-मु.पो. दापोली पारगाव ता. पनवेल जि. रायगड

वरील प्रमाणे माजी संचालक व अधिकारी आदयक्रांतीवीर उमाजी नाईक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली या संस्थेच्या कलम ८८ अन्वये चौकशी नंतर व मा. सहाय्य् निबंधक सहकारी संस्था पनवेल यांचे दिनांक २३/०३/२०१० महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ चे नियम ७२ नुसार आर्थिक नुकस रक्कम कलम ९८ व अन्वये जमीन महसुलीची थकबाकी वसुली करणेचे प्रमाणपत्र या नुसार वरील १ ते ६ यांचेकडून खालील प्रमाणे रक्कम येणे आहे.

| | |
|---|---|
| १. श्री. रंगनाथ सादू मदने | रक्कम रु. ७१५५५.०० |
| २. श्री. जालिंदर बाबुराव शिंदे | रक्कम रु. ७१५५५.०० |
| ३. श्री. सुरेश बाबुराव जाधव | रक्कम रु. ७१५५५.०० |
| ४. श्री. शिवाजी पांडुरंग चव्हाण | रक्कम रु. ७१५५५.०० |
| ५. श्री. सुनिल मार्तंड पुणदिकर | रक्कम रु. ७१५५५.०० |
| ६. श्रीमती सुप्रिया सुनिल पुणदिकर | रक्कम रु. २००६.०० |

या वरील रकमेवर दि.०९/०५/२००४ पासूनचे व्याज व इतर खर्च या प्रमाणे रक्कम येणे आहे.

त्या अर्थी वरील प्रमाणे अनुक्रमांक १ ते ०६ या प्रतिवादींना या नोटीसीद्वारे समज देणेत येते की खालील तपशीलात नमूद केल्यानुसार तुमच्याकडील थकबाकीची पूर्ण रक्कम मुददल व्याज नोटीसखर्च दावा खर्च इतर खर्च या सर्व खर्चासहीत रक्कम वसुलीसाठी आपणास या आधिही वारंवार तोंडी व लेखी कळवूनही आपण रक्कम न भरल्याने जंगम जप्तीतून वसुलीसाठी ही नोटीस अदा केली आहे. दि. १५/१०/२०२६ रोजी सुर्योदयापासुन सुर्यास्तापर्यंत जप्तीच्या कारवाईसाठी आम्ही आपणाकडे येणार आहोत. तुम्ही यावेळी समक्ष उपस्थित रहावे. तुम्ही सदर दिवशी हजर न राहिल्यास तुमचे अपरोक्ष तुमचे जंगम मालाची जप्ती केली जाईल. नोटीस मिळाले नंतर तुम्ही संस्थेत रक्कम भरणा केल्यास त्या चलनाची प्रत विशेष वसुली अधिकारी यांना दाखवावी. अन्यथा सदरहु रक्कम लॅंड रेव्हेन्यू प्रमाणे असलेल्या तरतूदी प्रमाणे सक्तीचे उपायांनी वसुल करणे भाग पडेल. त्यासंबंधी तुमची कोणतीही तक्रार नंतर ऐकली जाणार नाही याची दखल घ्यावी.

**सही/-**
**विशेष वसुली अधिकारी**
**आदयक्रांतीवीर उमाजी नाईक नागरी सह.**
**पतसंस्था मर्या. कळंबोली**

# विद्यार्थ्यांकडून खारफुटी स्वच्छता मोहीम

## एनएसएस विभागाचा सहभाग



**नवी मुंबई : बातमीदार**

सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असून स्वच्छता ही सेवा मोहिमेच्या अनुषंगाने लोकसहभागातून स्वच्छताविषयक उपक्रमांवर भर दिला जात आहे. त्या अनुषंगाने आठ विभाग कार्यालय क्षेत्रात नऊ सागरी किनाऱ्यांच्या ठिकाणी खारफुटी स्वच्छता मोहिमा व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असल्याची माहिती देत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी या मोहिमांमध्ये स्वयंसेवी संस्थांप्रमाणेच एनएसएस विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर लाभलेला सहभाग स्वच्छ नवी मुंबईच्या भविष्यासाठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने डोलाया सागरी किनारा करावे येथील स्वच्छता मोहिमेप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधला. मुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता अधिकारी पवन कोवे, स्वच्छता निरीक्षक विजय नाईक व लवेश पाटील तसेच मॅनग्रुव्हज् सोल्जर या सेवाभावी संस्थेचे प्रमुख धर्मेश बराई, एनएसएसच्या जिल्हा समन्वयक सुनीता पाल, क्षेत्रीय समन्वयक दीपक पोखरकर व निशा बरखातू आणि इतर मान्यवर तसेच २५०हून अधिक एनएसएस विद्यार्थी व नागरिक येथील स्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय सहभागी झाले.

अशाच प्रकारच्या मोहिमा दिवाळे जेटी बेलापूर, सारसोळे जेटी नेरूळ, वाशी जेटी, तुर्भे तलाव, धारण तलाव सेक्टर १९ कोपरखैरणे, घणसोली जेटी, ऐरोली जेटी सेक्टर १० आणि दिघा तलाव येथे एनएसएस विद्यार्थी व नागरिकांच्या सक्रिय सहभागातून यशस्वीरित्या राबविण्यात आल्या. या सर्वच ठिकाणी खाडी किनाऱ्यावरील खारफुटीमध्ये अडकलेला समुद्रातून वाहून आलेला प्लास्टिक, काच, चपला, बूट, बाटल्या अशा स्वरूपाचा अविघटनशील कचरा गोण्यांमध्ये संकलित करण्यात आला व सागरी किनारा आणि खारफुटी परिसर स्वच्छ करण्यात आला.

एस.के. कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स नेरूळ, वेस्टर्न कॉलेज नेरूळ, फकिरजी गणोजी नाईक कॉलेज कोपरखैरणे, सरस्वती कॉलेज बेलापूर, स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी नेरूळ, आयसीएल मोतीलाल झुनझुनवाला महाविद्यालय वाशी, दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ऐरोली, सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय ऐरोली, न्यू होरायझन कॉलेज ऑफ कॉमर्स ऐरोली, टिळक कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स वाशी, डीव्हीएस कॉलेज ऑफ कॉमर्स कोपरखैरणे, लोकमान्य टिळक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोपरखैरणे, रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर, फा. सी. रॉड्रिग्ज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वाशी, राजीव गांधी कॉलेज वाशी, सानपाडा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड टेक्नॉलॉजी, इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग घणसोली, ए.सी. पाटील कॉलेज, मेहता डिग्री कॉलेज ऐरोली, स्टर्लिंग कॉलेज आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स नेरूळ, बंट्स इन्स्टिट्यूट नेरूळ, एमजीएम कॉलेज, सागरी सीमा मंच अशा विविध महाविद्यालयांमधील २०००हून अधिक विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयीन क्षेत्राच्या विभागातील खारफुटी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

समुद्र, खाडी अशा पाण्यामध्ये टाकून दिला जाणारा कचरा भरती, ओहोटीच्या काळात समुद्र वाहून किनाऱ्यावर आणतो. त्यामुळे पर्यावरणाची हानी होते हे लक्षात घेत कोणत्याही प्रकारचा कचरा पाण्यात टाकला जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे हे लक्षात आणून देत नागरिकांच्या स्वच्छताविषयक वर्तनात अधिक सतर्कता आणण्याची गरज यावेळी विद्यार्थ्यांमार्फत व्यक्त करण्यात आली.

# खाडीकिनारा स्वच्छतेसाठी एकवटले हजारो जणांचे हात!

## आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिनी व्यापक मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या किनारपट्टीला लाभलेला खाडीकिनारा हा शहराच्या पर्यावरणीय समृद्धीचा महत्त्वाचा भाग आहे, मात्र वाढत्या नागरीकरणामुळे खाडीकिनाऱ्यावर वाढणारा प्लास्टिक, बाटल्या व अन्य कचरा पर्यावरणासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत रविवारी (दि. २७) आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिनाचे औचित्य साधून खाडीकिनारा स्वच्छतेची व्यापक मोहीम राबविण्यात आली.

सागरी सीमा मंच, नवी मुंबई आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सागरी किनारा, बीच स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ऐरोली जेटी, वाशी जेटी, दिवाळे कोळीवाडा जेटी आणि करावे परिसरातील सागरी किनारा व खाडी परिसरात ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. मोहिमेत विद्यार्थी, नागरिक, स्वयंसेवी संस्था तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागींनी खाडीकिनाऱ्यावर पडलेला प्लास्टिक कचरा, बाटल्या, थर्माकोल व इतर घनकचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला.

एकाच दिवशी एकाच वेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश दिला असून हजारो हातांनी केलेली ही स्वच्छता केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता स्वच्छतेची ही चळवळ प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनावी यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे हा आहे.

# विसरलेली बॅग प्रवाशाला परत

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**नवी मुंबई : बातमीदार**

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जीवनशैलीत माणुसकी, विश्वास आणि प्रामाणिकपणा जपणारी माणसं समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरतात. विशेषतः एखाद्याची मौल्यवान वस्तू सापडल्यानंतर त्यावर स्वतःचा हक्क न सांगता ती प्रामाणिकपणे संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, ही नक्कीच कौतुकास्पद बाब आहे. असाच प्रामाणिकपणा आणि माणुसकीचा प्रत्यय नेरूळ ते बेलापूर प्रवासादरम्यान रिक्षाचालक अमर बाये यांनी दिला.

बुधवारी सकाळी ८.१५ वाजता सीवूड स्टेशन येथून प्रवासी लिनू के. यांनी अमर बाये यांच्या रिक्षेतून बेलापूरपर्यंत प्रवास केला. प्रवाशाला बेलापूर येथे सोडल्यानंतर काही वेळाने रिक्षेत एक बॅग राहिल्याचे अमर बाये यांच्या लक्षात आले. त्या बॅगेत महत्त्वाची कागदपत्रे तसेच काही रोकड असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बॅग स्वतःकडे ठेवण्याऐवजी ती संबंधित प्रवाशापर्यंत पोहोचवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. प्रवाशाचा शोध घेण्यासाठी त्यांनी आपले मित्र कृष्णा कोळी यांना सोबत घेतले आणि प्रवाशाला ज्या ठिकाणी सोडले होते, त्या ठिकाणी पुन्हा जाऊन



त्याच्याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली.

बराच प्रयत्न केल्यानंतर त्यांनी संबंधित प्रवाशाचा शोध घेतला आणि त्याची बॅग त्यातील सर्व वस्तूंसह सुखरूप परत केली. बॅग परत मिळाल्याने प्रवाशाच्या चेहऱ्यावर समाधान उमटले. यावेळी महत्त्वाची कागदपत्रे आणि रोकड सुरक्षित मिळाल्याने प्रवाशाने अमर बाये यांचे मनापासून कौतुक करत त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि माणुसकीबद्दल आभार मानले. अमर बाये आणि त्यांचे मित्र कृष्णा कोळी यांच्या या कृतीचे कौतुक होत आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात ज्वेलर्सवर डल्ला

## भिंतीला भगदाड पाडून ७.७९ लाखांचा ऐवज लंपास

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या ढोल-ताशांच्या गजराचा फायदा घेत चोरट्यांनी वाशीतील कोपरी गाव परिसरातील एका ज्वेलर्सचे दुकान फोडून सात लाख ७९ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. शेजारील फळ विक्रेत्याच्या गाळ्यातून गॅस कटरच्या साहाय्याने भिंतीला भगदाड पाडून ही घरफोडी करण्यात आली असून याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार वाशी सेक्टर २६, कोपरी गाव येथील दाजी पाटील बिल्डिंगमधील मेघना ज्वेलर्स हे दुकान शुक्रवारी रात्री ११ वाजता नेहमीप्रमाणे बंद करण्यात आले होते. शनिवारी सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास दुकान उघडल्यानंतर चोरीचा प्रकार समोर आला. चोरट्यांनी



शेजारील शॉप क्रमांक १ मधील फळ विक्रेत्याच्या गाळ्यातून ज्वेलर्सच्या भिंतीला गॅस कटरने भगदाड पाडले आणि आत प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानातील सुमारे २.५ किलो वजनाचे सहा लाख ८७ हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने, ६५ हजार रुपयांचे सोन्याचा अंश असलेले दागिने व २७ हजार ५०० रुपयांची रोकड असा एकूण ७,७९,५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

यानंतर चोरटे तिजोरी फोडण्याचा प्रयत्न करत असतानाच दुकानातील अलार्म वाजला, ज्यामुळे चोरट्यांनी घाईघाईत तेथून काढता पाय घेतला. तपासादरम्यान शेजारील फळ विक्रेत्याचा गाळा काही दिवसांपूर्वीच भाड्याने घेण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. घटनेनंतर संबंधित फळ विक्रेता फरार असल्याने त्याच्यासह त्याच्या साथीदारांवर संशयाची सुई असून त्यांच्या सहभागाच्या अनुषंगाने तपास गतिमान करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.


परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. याप्रकरणी ज्वेलर्सचे मालक मोतीसिंह मोहनसिंह परमार यांच्या तक्रारीवरून एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक निलेश पाटील करीत आहेत.

# खडताळ पूल टॉवरचा वीजपुरवठा पूर्ववत

## महावितरणची तत्परता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खडताळ पूल टॉवर येथे उद्भवलेल्या अत्यंत



बिकट आणि आव्हानात्मक परिस्थितीत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्रीच्या वेळी युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा वेळेत पूर्ववत केला. त्यांच्या तत्परतेबद्दल नागरिकांकडून कौतुक व विशेष आभार व्यक्त करण्यात आले. महावितरणचे अधीक्षक अभियंता बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता राजेश भगत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आकाश तायडे, शहर शाखा अभियंता चतारे, पिंपळे, डफळ वैभव तसेच सहायक अभियंता गलांडे लक्ष्मीकांत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही रात्री उशिरापर्यंत मेहनत घेतली.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित पथकाने तातडीने आवश्यक कामे पूर्ण करत नागरिकांना दिलासा दिला. त्यामुळे महावितरणच्या संपूर्ण टीमच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि तत्पर सेवेचे कौतुक होत आहे.

# भरती परीक्षा सुधारणांवर उच्चस्तरीय समितीशी संवाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी गठीत राज्य भरती परीक्षा सुधारणा उच्चस्तरीय समिती कोकण विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार आणि संबंधित घटकांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहे. मंगळवार २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता चेतना कॉलेज, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाजवळ, चेतना महाविद्यालय मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ येथे हा संवाद आयोजित करण्यात आला असल्याची माहिती विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिली.

भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा प्रभावी, पारदर्शक व उमेदवारांच्या अनुभवांवर आधारित करण्याच्या दृष्टीने याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, शैक्षणिक संस्था, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित यंत्रणा, विषयतज्ज्ञ तसेच अन्य संबंधित घटकांना आपले अनुभव, अडचणी, अपेक्षा मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# गणेशोत्सवातील निर्माल्यातून खतनिर्मिती

## तुर्भेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरणपूरक उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**


पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वाढत्या पर्यावरणीय समस्यांवर मात करण्यासाठी नवी मुंबईतील तुर्भे येथील आयसीएल मोनामी शाळेच्या विद्यार्थ्यांनी एक अत्यंत प्रेरणादायी व अनुकरणीय उपक्रम हाती घेतला आहे. तुर्भे येथील प्रसिद्ध नवी मुंबईचा राजा सार्वजनिक मंडळाकडून निर्माल्य संकलित करत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक संदेश दिला आहे. या संकलित निर्माल्यापासून आता सेंद्रिय खत तयार केले जाणार असून ते शाळेतील झाडांच्या संगोपनासाठी वापरण्यात येणार आहे.



आयसीएल शाळेच्या शिक्षक व विद्यार्थी यांनी राबवलेल्या उपक्रमाची शिवछाया मित्र मंडळाचे अध्यक्ष अंकुश वैती यांनी प्रशंसा केली. शाळेच्या वाहतूक सुरक्षा दल, नागरी संरक्षण आणि इको क्लबच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम राबविले जातात. याही वर्षी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साह व उत्स्फूर्त सहभागातून हा गणपती विसर्जनोत्तर निर्माल्य संकलनाचा संकल्प पूर्ण केला. कचऱ्याचे व्यवस्थापन आणि निसर्गाचे जतन कसे करावे, याचे प्रत्यक्ष धडे विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून गिरवले आहेत.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी आयसीएल संस्थेच्या संचालक सीता राव आणि शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी ढवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच वाहतूक सुरक्षा दल, नागरी संरक्षण अधिकारी व इको क्लबच्या प्रमुख स्मिता नारायणे, निलेश्वर अहिरे, स्वाती मोंडकर, सोनाली बोरसे आणि तेजश्री तनपुरे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व या सामाजिक मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. शाळकरी वयातच मुलांमध्ये सामाजिक जाणिवा रुजवणारा आणि इतर नागरिकांनाही पर्यावरण रक्षणाची प्रेरणा देणारा हा उपक्रम तुर्भे परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# वीजबिल भरण्यासाठी महावितरणचे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

बँक कर्मचाऱ्यांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर कल्याण, वाशी (नवी मुंबई), रायगड आणि पालघर येथील वीजग्राहकांनी २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाइन भरावे आणि गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत बँक कर्मचाऱ्यांनी संपाचा इशारा दिल्याने बँकिंग व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक वीजग्राहक आपले वीजबिल धनादेशाद्वारे भरतात. त्यामुळे या कालावधीत वीजबिल भरणा व संकलन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो.

ज्या वीजग्राहकांची प्रॉम्प्ट पेमेंट तसेच ड्यू डेट २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीमधील असेल, अशा सर्व ग्राहकांनी गैरसोय टाळण्यासाठी शक्यतो ऑनलाइन पद्धतीने वीजबिल भरावे. महावितरणची अधिकृत वेबसाइट, मोबाइल ॲप तसेच उपलब्ध डिजिटल पेमेंटचा वापर करून घरबसल्या वीजबिलाचा भरणा २८ सप्टेंबरपूर्वी करावा. प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंट लाभासाठी तसेच विलंब आकार टाळण्यासाठी ग्राहकांनी देय तारखेपूर्वी वीजबिल भरावे.

भांडूप नागरी परिमंडल आणि कल्याण परिमंडलातील बहुसंख्य ग्राहक प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंटचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाइन पद्धतीने वेळेत वीजबिल भरून सवलतीचा लाभ घ्यावा आणि बँक कर्मचाऱ्यांच्या संपामुळे होणारी संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# कृत्रिम तलावातील विसर्जनास प्राधान्य

## शाडू मूर्तिकारांचा यथोचित सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा फुटांपर्यंतच्या उंच मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करावे, या महापालिकेच्या आवाहनास अनुसरून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कृत्रिम तलावात विसर्जन करीत पर्यावरणशील दृष्टिकोन जपल्याचे नवी मुंबईत पाहायला मिळाले. पर्यावरणपूरक प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याच्या आवाहनासही १४२० ठिकाणी शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. अशा नागरिकांना आकर्षक कागदी पिशवीसह महापौर व प्रमुख पदाधिकारी आणि आयुक्त यांच्या स्वाक्षरीचे 'पर्यावरण व स्वच्छतामित्र' प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सार्वजनिक गणेशोत्सवांच्या आकाराने मोठ्या मूर्तींचे विसर्जन होणार असल्याने सर्व विसर्जन स्थळांवर महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक सक्षम व्यवस्था ठेवण्यात आली होती. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व राहुल गेठे तसेच परिमंडळ १ उपआयुक्त अमोल पालवे व परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांच्या नियंत्रणाखाली आठही विभाग कार्यालयांमार्फत संबंधित विभागाचे सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि सर्व कार्यकारी अभियंता व त्यांचे सहकारी तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अजय गडदे यांच्या माध्यमातून मूर्ती विसर्जनासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी व स्वयंसेवक विसर्जन स्थळांवर सक्षमपणे कार्यरत होते.

त्यामुळे पहाटे ५.३० वाजेपर्यंत चाललेला हा विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडला. महापौर सुजाता पाटील व उपमहापौर दशरथ भगत यांनीही ठिकठिकाणच्या विसर्जन स्थळांना भेटी देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या तसेच विसर्जन व्यवस्थेविषयीचे अभिप्राय जाणून घेतले. नागरिकांकडून पालिका व पोलीस यांच्याकडून करण्यात आलेल्या व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. विसर्जन व्यवस्थेंतर्गत सर्व १५६ कृत्रिम तलावांवर स्वयंसेवकांसह सुयोग्य व्यवस्था होती. २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांवर संबंधित विभाग कार्यालयांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक व लाईफगार्ड्स तसेच अग्निशमन दलाचे जवान कार्यरत होते. पोलीस यंत्रणा विसर्जन स्थळे तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सज्ज होती.

सर्व नैसर्गिक विसर्जनस्थळांवर नागरिकांच्या सुरक्षा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सीसीटीव्ही लावण्यात आले होते. मूर्ती विसर्जनाकरिता विसर्जनस्थळी मध्यम व मोठ्या तराफ्यांची तसेच मोठ्या मूर्ती विसर्जनासाठी येतात अशा विसर्जन स्थळांवर फोर्कलिफ्ट तसेच क्रेनची व्यवस्था करण्यात आली होती. विशेषत्वाने कोपरखैरणे सेक्टर १९ येथील धारण तलावावर मोठ्या मूर्तींची अधिक संख्या लक्षात घेऊन विशेष व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जन स्थळांवर होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन सुरक्षेसाठी बांबूचे बॅरिकेटिंग करण्यात आले होते व विद्युत व्यवस्थेसह जनरेटरची पर्यायी व्यवस्था ठेवण्यात आली होती. त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी व प्रथमोपचार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

भक्तजनांना मूर्तींची निरोपाची आरती व सांगता पूजा करता यावी, या दृष्टीने विसर्जनस्थळी टेबलची व्यवस्थित मांडणी करण्यात आली होती. संबंधित विभाग कार्यालयांच्या माध्यमातून सर्व विसर्जन स्थळांवर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक वाशी येथे सूचना व स्वागतासाठी उभारण्यात आलेल्या व्यासपीठामुळे भाविकांची गर्दी मोठी असूनही त्यांना आवश्यक सूचना देणे व गर्दीचे नियोजन करणे शक्य झाले.

# पोलादपूरनजीक लोहारे येथे जुगाराच्या अड्ड्यावर छापा; ४२ आरोपींची धरपकड



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या लोहारे गटातील निवडणूक प्रचारादरम्यान उघडपणे टीका होऊनही अव्याहतपणे सुरू राहिलेल्या सर्वात मोठ्या जुगाराच्या अड्ड्यावर शनिवारी दुपारी अलिबाग पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार छापा मारण्यात आला. यावेळी ४२ आरोपींची धरपकड करण्यात येऊन १२ लाख किंमतीचे मोबाईल, मोटारसायकली, कार, जुगाराचे साहित्य, फर्निचर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहे. यावेळी काउंटरवरील १ लाख ३ हजार ९४० रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत लोहारे येथील शिवराज बियर शॉपीच्या मागे जुगाराचा कायमस्वरूपी अड्डा सुरू असल्याची चर्चा व टीका रायगड जिल्हा परिषदेच्या लोहारे गटातील निवडणूक प्रचारादरम्यान विधानपरिषदेचे भाजपा गटनेते प्रवीण दरेकर यांनी जाहीर सभेत केली होती. मात्र, याकडे संबंधित यंत्रणांनी गांभिर्याने लक्ष दिले नाही आणि हा जुगाराचा अड्डा राजकीय वरदहस्त लाभल्यामुळे सुरक्षित असल्याची भावना वाढीस लागली होती.

परिणामी, जुगारी लोकांना हे सुरक्षित ठिकाण वाटत असल्याने माणगाव, लोणेरे, टेमपाले, गारळ, उणेगाव, गोरेगाव, शिरगाव, महाड, पोलादपूर, वाडा कुंभरोशी येथील तब्बल ४२ जुगारी येथे आपल्या ताब्यातील वाहने, मोबाईल व रोख रक्कम घेऊन जुगार खेळताना अलिबाग पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार शनिवारी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास छापा घातला. यात आरोपींच्या अंगझडतीतून ३० मोबाईल, तीन मोटारसायकली, दोन वॅगनआर कार, रोख रक्कम व जुगारासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक कॉइन्स आदी मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल आणि मुख्यालयाच्या आदेशानुसार म्हसळा परिमंडळ पोलीस उपअधीक्षक योगिता कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या जुगाराच्या अड्ड्यावरील धाडीदरम्यान दोन पोलीस व्हॅनमधून आरोपींना पोलादपूर पोलीस ठाण्यात आणले गेले. यावेळी ३८ आरोपी प्लास्टिक कॉइन स्वरूपात रक्कम लावून तीन पत्ता जुगार खेळताना आढळून आले तर चार आरोपींनी स्वतःच्या फायद्यासाठी ३८ आरोपींकडून रक्कम घेऊन बंदिस्त जागा आणि साहित्य उपलब्ध करून दिले म्हणून गुन्हा र.नं. १०२/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कलम ४,५ प्रमाणे क्रमांक ३० नुसार नोंद केली. पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस मुख्यालय अलिबाग येथील पोलीस शिपाई आशिष अशोक गडदे यांनी फिर्याद नोंदवली.

पोलादपूर पोलीस ठाण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीच्या तयारीत महिला व पुरुष पोलीस कर्मचारी व्यग्र असताना अचानक पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार झालेल्या या छाप्यानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यामुळे विसर्जन मिरवणूक तब्बल साडेतीन तास उशिराने सुरू झाली.

# रविवारी सुट्टीच्या दिवशीही सरकारी बँकांनी दिली सेवा

**मुरुड : प्रतिनिधी**

आठवड्याच्या पाच दिवस बँका सुरू राहाव्यात व सलग शनिवार रविवार सुट्टी असावी या प्रमुख मागणीसाठी सोमवार पासून सर्व राष्ट्रीय बँका बेमुदत बंद पुकारण्यात येणार असल्याने आज रविवारी ग्राहकांना बँक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती, परंतु आज बँका उघड्या असून सुद्धा ग्राहकाला जास्तीत जास्त माहिती प्रसारित न झाल्याने ग्राहकांनी आर्थिक व्यवहाराकडे पाठ फिरवली होती.

आज आमच्या प्रतिनिधीने सर्व बँकेची पाहणी केली असता कोणत्याही बँकेत जास्त गर्दी दिसून आली नाही. उपलब्ध बँक ग्राहकांपैकी फक्त १५ टक्के लोकांनी आज बँक व्यवहार केले. त्यामुळे बँकेत फारशी गर्दी दिसून आली नाही. आता सोमवार पासून बँका बेमुदत बंद राहणार आहेत. त्यामुळे शहर व ग्रामीणभागात याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे.

आज बँका उघड्या असून सुद्धा ग्राहकाला माहिती प्रदान न केल्याने ग्राहक मोठ्या प्रमाणात बँकेत येऊ शकलेला नाही. यासाठी बँकेने जनजागृती व लोकांना माहिती होईल असा प्रचार करणे खूप आवश्यक होते. परंतु ग्राहकाला दुय्यम दर्जा देत बँकांनी आज आपला आर्थिक व्यवहार पूर्ण केला आहे.

आता ग्राहकांना सोमवारपासून सर्व आर्थिक व्यवहार बंद होणार आहेत. त्यामुळे बँक ग्राहकाचे पुरते हाल होणार आहेत. सदरचा संप किमान एक आठवडा तरी चालेल अशी माहिती मिळत आहे.



# कर्जतमध्ये अनंत चतुर्दशीच्या १११४ गणरायांना भावपूर्ण निरोप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अनंत चतुर्दशीच्या १७ सार्वजनिक व १०९७ खाजगी अशा एकूण १११४ गणरायाना भावपूर्ण निरोप देण्यात आला. भाविकांनी नदी तसेच गावाजवळ असलेल्या तलाव व ओढ्यांमध्ये गणरायाचे विसर्जन करीत बाप्पाला निरोप दिला.

कर्जत तालुक्यातील कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक ९, खाजगी ४२४. नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ७ सार्वजनिक, खाजगी ६६५ आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक एक व खाजगी ८ अशा एकूण १११४ गणेशमूर्तींचे पुढच्या वर्षी लवकर या च्या गजरात आज अनंत चथुर्दशीच्या दिवशी विसर्जन करण्यात आले. नगरपरिषद क्षेत्रात विसर्जन ठिकाणी नगरपरिषदेने नदीत निर्माल्य टाकून पाणी दूषित होऊ नये म्हणून निर्माल्य एकत्र करण्यात येत होते.

कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचे विसर्जन वेगळ्या पद्धतीने केले जाते. लोकमान्य टिळक चौकात अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला, स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतन, विद्या विकास मंदिर, शारदा मंदिर ( मराठी माध्यम ), शरदा मंदिर ( इंग्रजी माध्यम )



या शाळां मधील विद्यार्थ्यांनी लेझीम, कवायत व नृत्ये सादर केली. विवेक भागवत यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक अशोक राऊत, महेंद्र चंदन, राजाभाऊ कोठारी, कुमेश मोरे, मानसी कानिटकर, नेहा शिंदे आदींनी नगरपरिषदेच्या वतीने स्तुत्य उपक्रमाबद्दल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा सन्मान केला. मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ करण्यात आला. ही मिरवणूक शिवतांडव ढोल पथकाच्या तालावर महावीर पेठ मार्गे जकातनाका – मुख्य बाजारपेठ – कपालेश्वर मंदिर मार्गे गणेश घाटावर जात असताना मिरवणुकीच्या पुढे रस्त्यावर तसेच चौका चौकात रांगोळ्या काढण्यात येत होत्या. गणेश घाटावर पोहोचल्यावर गणरायाचे भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. याप्रसंगी अभिजीत मराठे, सदानंद जोशी, निलेश परदेशी, पंकज शहा, रामराव पाटील, मंगेश जोशी, अमित मराठे, मयुरेश जोशी, शैलेश हनुमंते, बंटी लोवंसी, रोनक कोठारी, प्रसाद दळवी, दीपक बडगुजर, सर्वेश गोगटे, प्रथमेश दांडेकर, शिरीष दिघे, ज्योती कडू आदींसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. अनिरुद्ध उपासना ट्रस्ट च्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण मिरवणुकीत सहभागी होऊन सहकार्य केले.

उप विभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील, नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल बरोटे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. काही विभागातील गणेशमूर्ती एकाच वेळी वाहनांतून उल्हास नदीच्या घाटावर आणून त्यांचे विसर्जन केले. दहिवली, मुद्रे बुद्रुक, मुद्रे खुर्द, आकुर्ले गावातील भाविकांनी आपापल्या गणेश घाटांवर जाऊन गणरायाचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन केले. गुंडगे आणि भिसेगाव येथील भाविकांनी कर्जत मधील गणेश घाटावर येऊन आपल्या गणेश मूर्तींचे विसर्जन केले. काही गावांमध्ये तलावात गणेश विसर्जन करण्यात आले.

# नागोठणे पोलीस ठाण्यात पत्रकारांना गणरायाच्या आरतीचा मान

**नागोठणे : बातमीदार**

कर्तव्याच्या धावपळीत गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नागोठणे पोलीस ठाण्यात भक्तीभावासोबतच लोकसहभागालाही महत्त्व देण्यात येत आहे. पोलीस ठाण्यातील गणरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या परिसरातील महिला, तरुणी आणि नागरिकांना सहभागी करून घेण्याच्या उपक्रमांतर्गत शनिवारी (ता. २६) सकाळी पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सपोनि रविंद्र पारखे यांच्या पुढाकाराने पोलीस ठाण्यातील गणेशोत्सवाला यंदा लोकाभिमुखतेची जोड मिळाली आहे.



गणेशोत्सव काळात वाहतूक नियंत्रण आणि बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलिसांना दरवर्षी आपल्या गावाकडील उत्सवात सहभागी होता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन सपोनि रविंद्र पारखे यांनी पोलीस अधिकारी, महिला अंमलदार आणि कर्मचाऱ्यांना गणेशोत्सवात भक्तिभावाने सहभागी होण्याची संधी दिली. दररोज सकाळी व सायंकाळी महाआरती घेण्यात आल्याने गणेशोत्सवातील बंदोबस्तामुळे आपल्या गावी जाता न आल्याने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांना पोलीस ठाण्यातील बाप्पांच्या रोजच्या महाआरतीत सहभागी होता आले.

शनिवारी सकाळी आयोजित महाआरतीसाठी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, सहसचिव राजेंद्र जोशी आदींनी गणरायाची आरती केली. या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, पोलीस उपनिरीक्षक राजहंस नागदिवे, पोलीस उपनिरीक्षक गोटीराम पावरा, सहायक फौजदार राजेश जगताप यांच्या हस्ते पत्रकारांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पो. ह. महेश लांगी, पो. ह. अथर्व पाटील, महिला पोलीस हवालदार मनीषा लांगी, मोनिका शेरमकर, पोलीस शिपाई स्वप्निल भालेराव, सौरभ पाटील, अभिषेक साटम, महिला पोलीस शिपाई सुवर्णा बोडेकर, होमगार्ड भावना भोईर व नागरिक उपस्थित होते.

# तळा शहरात अनंत चतुर्दशीच्या श्रीगणेशांचे भक्तिमय वातावरणात विसर्जन

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरासह तालुक्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी २५ सप्टेंबर रोजी लाडक्या बाप्पाला अत्यंत उत्साहात,भक्तिमय वातावरणात आणि 'गणपती बाप्पा मोरया ,पुढच्या वर्षी लवकर या ' या जयघोषात भावपूर्ण निरोप देण्यात आला.



२५ सप्टेंबर रोजी शहरात सकाळपासूनच गणेश विसर्जनाच्या तयारीला गणेशभक्त लागले होते.दुपारी आरती झाल्यानंतर अंदाजे चार ते पाच वाजल्यापासून भक्तगणांनी श्रीगणेशाच्या मिरवणुका काढून पारंपारिक, आध्यात्मिक साध्या पध्दतीने खालूबाजा,ढोल ताशे व भजन गात नाचत गणपती बाप्पा मोरया,पुढल्या वर्षी लवकर या घोषणा देत , गजानना श्री गणराया, बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे भजन म्हणत नदी,तलावावर गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप दिला.

भक्तगणांनी संवाद साधला असता ते म्हणाले की यावर्षी बारा दिवस आमच्याघरी बाप्पा राहीले मोठा आनंद झाला.विविध आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे मन शांत होऊन मन प्रसन्न व आनंदी राहीले आहे.वर्षातून येणारे हे गणेशोत्सव मनात पुढील गणेशोत्सव येईपर्यंत या आठवणी जागृत राहतात.या विसर्जनाच्या दिवशी मन दुःखी होत असते.


# कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळेचे आयोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव, रायगड येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दिनांक २६ सप्टेंबर रोजी कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरणाचे संरक्षण, प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करणे तसेच पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा वापर करून कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कागदी पिशव्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव व्यावहारिक कौशल्याला वाव मिळतो.



# दुःखद प्रसंगी ग्रामपंचायत धावणार कुटुंबीयांच्या मदतीला; चरई खुर्द ग्रामपंचायत अंत्यविधी सहाय्य योजना राबविणार!

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या सुख-दुःखात ग्रामपंचायत सहभागी व्हावी, या सामाजिक भावनेतून ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द यांनी एक समाज उपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. ग्रामपंचायत हद्दीतील कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूच्या प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना अंत्यविधीसाठी ३ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याची 'अंत्यविधी सहाय्य योजना' सुरू करण्याचा ठराव ग्रामपंचायत मासिक बैठकीत व झालेल्या ग्रामसभेत मंजूर करण्यात आला आहे.

शासनाच्या प्रचलित नियमांनुसार ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या मृत्यूची नोंद विहित मुदतीत, अर्थात ७ दिवसांच्या आत ग्रामपंचायत कार्यालयात करणे आवश्यक आहे. मृत्यूची नोंद वेळेत व्हावी आणि दुःखद प्रसंगी संबंधित कुटुंबीयांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तातडीचा आधार मिळावा, या दुहेरी सामाजिक व प्रशासकीय उद्देशाने ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या घरी जाऊन मृत्यू दाखला व ३ हजार रुपयांचा आर्थिक सहाय्याचा धनादेश ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुपूर्द करण्याचा मानस आहे. त्यामुळे मृत्यूची नोंदणी वेळेत होण्यास प्रोत्साहन मिळण्याबरोबरच दुःखाच्या प्रसंगी कुटुंबीयांना ग्रामपंचायतीचा आधार मिळणार आहे.

"ग्रामपंचायत ही केवळ कर वसुली करणारी स्थानिक स्वराज्य संस्था नसून करदात्या नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी आणि त्यांच्या पाठीशी उभी राहणारी लोकाभिमुख संस्था आहे," हा सामाजिक संदेश या उपक्रमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या योजनेची संकल्पना सरपंच प्रविण चंद्रकांत आंबार्ले यांनी मांडली. त्यांच्या संकल्पनेला उपसरपंच अजय अनंत सावंत , ग्रामपंचायत सर्व सदस्य-सदस्या, ग्रामपंचायत अधिकारी राजेश लक्ष्मण खैरे तसेच ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्वानुमते सहमती दर्शविली.

सदर योजनेचा ठराव व आवश्यक प्रस्ताव मुख्यकार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, गटविकास अधिकारी सुनील गायकवाड यांच्याकडे प्रशासकीय व शासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

# मोहोपाड्यातील शिबिरात ५६ जणांची नेत्र तपासणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

'स्वस्थ डोळे, सुंदर जीवन' या संकल्पनेतून 'मोतिबिंदूमुक्त पाताळगंगा, रसायनी आणि खालापूर तालुका अभियान' अंतर्गत आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल आणि रोटरी क्लब पाताळगंगा रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, २६ सप्टेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू ऑपरेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.हे शिबिर मोहोपाडा येथील गणपती मंदिरात सकाळी ९ ते दुपारी२ वाजेपर्यंत घेण्यात आले.



शिबिरात एकूण ५६ नागरिकांची नेत्र तपासणी (ओपीडी) करण्यात आली. तपासणीनंतर ४२ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले, तर त्यापैकी २८ रुग्णांना पुढील मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात नेण्यात आले.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोतिबिंदूमुळे दृष्टी कमी झालेल्या रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी अशा शिबिरांचा मोठा उपयोग

# तेजिंदरपाल तूरची हॅट्ट्रिक

## तिसऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पदकाला गवसणी

**टोकियो : वृत्तसंस्था**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा स्टार गोळाफेकपटू तेजिंदरपाल सिंह तूरने भारताच्या खात्यात आणखी एका पदकाची भर घातली. २०.६४ मीटर अंतराची गोळाफेक करत त्याने रौप्यपदकावर नाव कोरले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील तेजिंदरपालचे हे सलग तिसरे पदक ठरले. याआधीच्या दोन स्पर्धांमध्ये त्याने सुवर्णपदकाची कमाई केली होती.

यंदा सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक करत ट्रॅक अँड फील्डमध्ये ऐतिहासिक कामगिरी करण्याची संधी तेजिंदरपालकडे होती, मात्र ही संधी अवघ्या काही मीटरने हुकली. इराणच्या मोहम्मदरेजा तैयबीने २०.८१ मीटरची सर्वोत्तम गोळाफेक करत सुवर्णपदक पटकावले आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील नवा विक्रमही आपल्या नावावर केला.




विशेष म्हणजे, याआधी आशियाई क्रीडा स्पर्धेतील गोळाफेकीचा विक्रम तेजिंदरपाल सिंह तूरच्या नावावर होता. त्याने २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत २०.७५ मीटरची गोळाफेक करत सुवर्णपदक जिंकले होते. आता इराणच्या तैयबीने २०.८१ मीटरची कामगिरी करत त्याचा विक्रम मोडला.

तेजिंदरपालने पहिल्या प्रयत्नात २०.०६ मीटरची गोळाफेक केली. दुसरीकडे तैयबीने पहिल्याच प्रयत्नात २०.३० मीटरची नोंद करत आघाडी घेतली. त्यानंतर सौदी अरेबियाच्या खेळाडूने २०.४८ मीटरची गोळाफेक करत दोघांनाही मागे टाकले होते, मात्र तेजिंदरपालने पाचव्या प्रयत्नात २०.६४ मीटरची सर्वोत्तम कामगिरी करत दुसरे स्थान मिळवले. इराणच्या तैयबीने दुसऱ्या प्रयत्नात नोंदवलेली २०.८१ मीटरची विक्रमी गोळाफेक तेजिंदरपालच्या सुवर्णपदकाच्या हॅट्ट्रिकच्या मार्गातील अडथळा ठरली. सौदी अरेबियाच्या खेळाडूला अखेर कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

# जिंदल विद्यामंदिरच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**मुरूड : प्रतिनिधी**

साळाव येथील जिंदल विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी कराटेत सुवर्णपदके, हँडबॉलमध्ये उपविजेतेपद आणि ॲथलेटिक्समध्ये अनेक पदकांची कमाई करत क्रीडा कौशल्याची छाप पाडली.

रोहा येथील एमडीएन इंटरनॅशनल स्कूल येथे झालेल्या जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या हँडबॉल स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. याच दिवशी मुरूड येथील अंजुमन हायस्कूल येथे झालेल्या तालुकास्तरीय कराटे स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात आदित्य चोरघे, मादियान कादरी आणि सान्वी शिवलकर यांनी सुवर्णपदक, तर गायत्री चुनेकर हिने रौप्यपदक मिळवले. १४ वर्षांखालील गटात दुर्वा नाईकने सुवर्णपदक प्राप्त केले.

मुरूड येथील ओंकार विद्या मंदिर येथे झालेल्या १७ वर्षांखालील मैदानी क्रीडा स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. आर्या बाणेने १०० मीटर, २०० मीटर धावणे आणि उंच उडी या तिन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवला. झियाद गोरमेने भालाफेकीत द्वितीय, मदीयानने १०० मीटर अडथळा



शर्यतीत प्रथम, मुहिबने ८०० मीटर धावण्यात प्रथम, तर दुर्वेश ठाकूरने ११० मीटर अडथळा शर्यतीत द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामागे क्रीडा विभागप्रमुख दुर्गाकला सिंग, प्रताप आणि वृशाली यांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वपूर्ण ठरले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव म्हणाले, विद्यार्थ्यांची जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण क्रीडा कामगिरी निश्चितच कौतुकास्पद असून त्यांच्या यशाचा अभिमान आहे.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी, क्रीडांगणावर विद्यार्थ्यांनी दाखवलेली चमकदार कामगिरी त्यांच्या मेहनतीचे फलित असून सर्व खेळाडूंचे अभिनंदन, असे सांगितले.

प्राचार्य मुकेश ठाकूर म्हणाले, विद्यार्थ्यांचे हे यश शाळेसाठी अभिमानाची बाब असून त्यांच्या मेहनतीला आणि आत्मविश्वासाला मनःपूर्वक सलाम! उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनीही सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# संदीप पाटील यांच्या मते सौरव गांगुली सर्वोत्तम कर्णधार!

## गिललाही पसंती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट इतिहासात सर्वोत्कृष्ट कर्णधार कोण? या संदर्भात नेहमीच चर्चा रंगत असते. सध्या महेंद्रसिंह धोनी, सौरव गांगुली, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची नावे यात आघाडीवर असतात. धोनीने भारताला तीन आयसीसी ट्रॉफी जिंकवून दिल्या आहेत. एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला आहे. आता या संदर्भात १९८३च्या विश्वविजेत्या भारतीय संघाचे खेळाडू तथा माजी मुख्य निवडकर्ते संदीप पाटील यांनी रोखठोक पसंती जाहीर केली आहे.

'न्यूज १८ इंडिया'च्या स्पोर्ट्स नेक्स्टच्या एका विशेष मुलाखतीदरम्यान संदीप पाटील यांना "एमएस धोनी की सौरव गांगुली, सर्वोत्तम कर्णधार कोण?" असा थेट प्रश्न विचारण्यात आला. यावर पाटील यांन क्षणाचाही विलंब न करता गांगुलीचे नाव घेतले. याशिवाय, शुबमन गिल की अभिषेक शर्मा? यावर उत्तर देताना त्यांनी अभिषेक आणि वैभव सूर्यवंशी यांच्यापेक्षा गिल हा अधिक सरस फलंदाज असल्याचे सांगितले.

# प्राची चौधरीला कांस्यपदक



**नागोया : वृत्तसंस्था**

भारताच्या प्राची चौधरीने आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ४०० मीटर अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले. या शर्यतीत बहरीनच्या सलवा ईद नासेरने सुवर्णपदक पटकावत आशियाई क्रीडा स्पर्धेचा विक्रम मोडला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व राखत तिने दमदार कामगिरीसह शर्यत जिंकली.

२९ वर्षीय भारतीय धावपटू प्राची चौधरीने ५३.२१ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्यपदक पटकावले. तिने अखेरच्या ५० मीटर अंतर कापताना जीवाचे रान करत दक्षिण कोरियाच्या किम सेयून हिला मागे टाकले. किमने ५३.३८ सेकंदांची वेळ नोंदवत चौथे स्थान मिळवले. दोघींच्यात फक्त १७ सेकंदाचे अंतर राहिले. प्राचीची ५३.२१ सेकंदांची वेळ तिच्या यंदाच्या सर्वोत्तम कामगिरीपेक्षा कमी राहिली. तिने ऑगस्टमध्ये भुवनेश्वर येथे झालेल्या वर्ल्ड ॲथलेटिक्स कॉंटिनेंटल टुर लिव्हर स्पर्धेत ५२.५७ सेकंदांची वेळ नोंदवली होती. तिची ४०० मीटरमधील वैयक्तिक सर्वोत्तम वेळ ५२.४० सेकंद असून तिने ही कामगिरी २०२३मध्ये केली होती.

या कांस्यपदकासह प्राचीच्या नावावर आशियाई क्रीडा स्पर्धेतील दुसरे पदक जमा झाले आहे. २०२३च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने महिलांच्या ४x४०० मीटर रिले संघासोबत रौप्यपदक जिंकले होते. या शर्यतीतील दुसरी भारतीय धावपटू किरण पहाल हिने ५३.४१ सेकंदांची वेळ नोंदवत पाचवे स्थान मिळवले.

## ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# नवतरुण, अश्वमेघ, साई कृष्णाई, स्व. राकेशदादा संघांची विजयी सलामी

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नवतरुण, अश्वमेघ, साई कृष्णाई, स्व. राकेशदादा यांच्या पहिल्या साखळी विजयाने कुमारी गट कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ. नगर शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, लोकमान्य गुरुकुल संकुल यांच्या सहकार्याने डोंबिवली(पूर्व) येथील एमआयडीसी, सुदर्शन नगर येथे ही स्पर्धा सुरू आहे.

क गटातील चुरशीच्या सामन्यात कल्याणच्या नवतरुण मंडळाने वाशीच्या रा.फ. नाईक संघाला ३०-२९ असे चकवित विजयी सलामी दिली. विश्रांतीला १०-१७ अशा पिछाडीवर पडलेल्या नवतरुणने विश्रांतीनंतर जोरदार मुसंडी मारत हा विजय खेचून आणला. आरती



शेळके, संजीवनी कारेकर यांच्या भन्नाट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. रा.फ.च्या वैभवी कासार, जुई कांबळे यांना विश्रांतीनंतर आपला प्रभाव पाडता आला नाही.

डोंबिवलीच्या अश्वमेघ मंडळाने ब गटात पहिल्या डावातील १५-२५ अशा १० गुणांच्या पिछाडीवरून कल्याणच्या ज्ञानशक्ती मंडळाला ३७-३२ असे नमविले. धानी रंधे, मानसी भोईर यांच्या दुसऱ्या डावातील आक्रमक खेळाला याचे श्रेय जाते. प्रणाली मालुसरे, समृद्धी चव्हाण यांना पहिल्या डावातील चमक दुसऱ्या डावात दाखविता न आल्याने ज्ञानशक्तीला हा पराभवाचा धक्का बसला.

साई कृष्णाईने क गटात माऊली स्पोर्ट्सला २३-१८ असे नमविले. साई कृष्णाईकडून प्रियंका साबळे, तर माऊली कडून श्रावणी शेलार उत्कृष्ट खेळल्या. ग गटात स्व. राकेशदादा मंडळाने ज्ञानविकास मंडळावर ३१-२४ अशी मात केली. सृष्टी पाटील, कोमल शिंदे यांच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाने राकेशदादाने पूर्वार्धात २३-०७ अशी भक्कम आघाडी घेतली होती. उत्तरार्धात ज्ञान विकासच्या समीक्षा बोरकर, सिद्धी माने यांनी आपला खेळ गतिमान करीत ही लढत चूरशीची केली.

रा.फ. नाईक संघाने ल गटात मात्र संघर्ष मंडळाला २५-१८ असे नमवत आगेकूच केली. अबोली काणे रा.फ.कडून, तर संस्कृती साळवी संघर्षकडून उत्तम खेळल्या. प्रेरणा मंडळाने जय अंबे मंडळावर ३१-२६ अशी मात केली. स्वरा माळी, मैत्राली या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. जय अंबेच्या रूपावली सोनार, रेश्मा सोमकर यांने कडवी लढत दिली. हिरकणी स्पोर्ट्सने ज गटात श्रेया साळुंखे हिच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर जिजाऊ मंडळावर १४-१२ असा विजय मिळविला. जिजाऊची कृतिका भाकरे चमकली.

# जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत मुगवलीच्या लीड स्कूलचे यश

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील एमडीएन फ्युचर स्कूल, कोलाड येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत लीड स्कूल मुगवलीच्या विद्यार्थ्यांनी दमदार क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी विविध वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपदासह उपविजेतेपद पटकावून शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली.



१४ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्यात अव्वल स्थान मिळविले. त्याचबरोबर १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने तसेच १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत उपविजेतेपदाचा मान पटकावला. या स्पर्धेसाठी खेळाडूंना शाळेचे क्रीडा प्रशिक्षक मंदार चवरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे संस्थापक, संचालक मंडळ, शाळेचे अध्यक्ष नितीन जिंदल, मुख्याध्यापक बसवराज जगाये, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच ग्रामस्थांनी विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीबरोबरच शाळेकडून क्रीडा क्षेत्राला दिले जाणारे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन याचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले.

# पी. व्ही. सिंधू उपांत्यपूर्व फेरीत

**नागोया : वृत्तसंस्था**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने आशियाई क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी करत जपानच्या टोमोका मियाझाकीचा सरळ गेममध्ये पराभव केला. या विजयासह सिंधूने स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला असून तिच्याकडून पदक मिळण्याच्या आशा कायम राहिल्या आहेत.

सामन्याच्या सुरुवातीलाच सिंधूने आक्रमक खेळ करत मियाझाकीवर दबाव निर्माण केला. सिंधूने पहिला गेम आपल्या नियंत्रणात ठेवत विजय मिळवला आणि सामन्यात आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये मियाझाकीने अधिक चांगली सुरुवात केली. तिने सिंधूवर सुरुवातीपासून दबाव आणण्याचा प्रयत्न केला, मात्र सिंधूने घाई न करता आपला खेळ कायम ठेवला आणि स्कोअर ५-५ असा बरोबरीत आणला.

यानंतर सिंधूने पुन्हा आक्रमक खेळावर भर दिला. तिच्या अचूक फटक्यांमुळे मियाझाकीच्या बचावात जागा निर्माण होत गेल्या. मध्यंतरापर्यंत सिंधूने ११-६ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात मियाझाकीने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र सिंधूने तिला सलग गुण मिळवण्याची संधी दिली नाही.

# अजिंक्य रहाणेचा सह्याद्रीच्या कुशीत आलिशान व्हिला

**इगतपुरी : प्रतिनिधी**

भारताचा माजी खेळाडू व कर्णधार अजिंक्य रहाणेने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केले आहे. यानंतर त्याने समालोचन क्षेत्रात पदार्पण केले. दरम्यान, रहाणे व त्याची पत्नी राधिका यांनी इगतपुरीमध्ये असलेल्या त्यांच्या आलिशान व्हिलाची झलक चाहत्यांना दाखवली आहे.



### कारकिर्दीला समर्पित खास खोली

या व्हिलामधील सर्वात खास जागांपैकी एक म्हणजे रहाणेच्या क्रिकेट कारकिर्दीला समर्पित असलेली खोली. या खोलीत क्रिकेटपटू म्हणून प्रवासातील अनेक आठवणी जपल्या आहेत. बॅट, बॉल, कॅप, संघाच्या जर्सी आणि सहकाऱ्यांबरोबरचे फोटो अशा अनेक वस्तू तिथे पाहायला मिळतात. रहाणेच्या म्हणण्यानुसार ही संग्रहित आठवणी पुन्हा पाहणे त्याच्यासाठी भावनिक अनुभव असतो. तो म्हणतो, या खोलीत प्रवेश करताच आजही त्याच्या अंगावर काटा येतो.

सह्याद्रीच्या डोंगररांगांच्या कुशीत आणि वैतरणा तलावाच्या नयनरम्य दृश्यासमोर असलेली ही वास्तू शहराच्या धावपळीपासून दूर कुटुंबासह निवांत वेळ घालवण्यासाठी उभारण्यात आली आहे. या व्हिलाची खास टूर स्टेविस्ताने यूट्युबवर शेअर केलेल्या व्हिडीओतून पाहायला मिळाली. 'राया इस्टेट' असे या व्हिलाचे नाव आहे. पाच बेडरूम असलेल्या या व्हिलाची रचना रहाणे, राधिका आ णि त्यांच्या मुलांसाठी खासगी सुट्टीचे ठिकाण म्हणून करण्यात आली आहे. चारही बाजूंनी डोंगर आणि हिरवाईने वेढलेल्या या व्हिलामध्ये पाच किंग-साइज बेडरूम, इन्फिनिटी पूल, गॅझेबो आणि हिरव्यागार बागा आहेत. याशिवाय आसपासच्या निसर्गाचे दृश्य पाहता येईल अशा अनेक बाल्कनी, मुलांसाठी खास प्ले एरिया आणि घरातील बारची सुविधाही आहे.

कोरोनानंतर या घराचे बांधकाम करण्यात आले. रहाणेने व्हिलची रचना करताना मोकळ्या जागा आणि उंचावलेल्या लिव्हिंग एरियाला प्राधान्य दिले. या घराच्या डिझाइनमागे त्याच्या बालपणीच्या आठवणीही आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत आजीच्या घरी गेल्यावर तो बाहेर खेळण्यात बराच वेळ घालवायचा, त्याच आठवणींतून या घराच्या रचनेची प्रेरणा मिळाली.

अजिंक्य रहाणेला आपल्या मुलांसाठीही बालपणीच्या आठवणींसारखे वातावरण तयार करायचे होते. मोकळ्या जागेत खेळता यावे आणि घराबाहेर वेळ घालवता यावा यासाठी व्हिलामध्ये पुरेशी खुली जागा ठेवण्यात आली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटूसाठी हे हॉलिडे होम म्हणजे कुटुंबासह निवांत वेळ घालवण्याबरोबरच स्वतःला रिलॅक्स करण्याचेही ठिकाण आहे.

# विनोद कांबळीचा वृद्धाश्रमातील व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी पुन्हा चर्चेत आला आहे. कांबळींचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, त्यामध्ये तो एका वृद्धाश्रमात दिसत आहे. त्याला अशा अवस्थेत पाहून अनेक क्रिकेट चाहत्यांनी चिंता व्यक्त केली आहे, पण या व्हिडीओमध्ये कांबळी स्वतः वृद्धाश्रमातील सुविधा आणि प्रसन्न वातावरणाचे कौतुक करताना दिसत आहे.

विनोद कांबळी 'निदान द मुक्ती' या वृद्धाश्रमात आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या एनजीओचे संस्थापक महेश



नाईक यांनी सांगितले की, कांबळी त्यांच्यासाठी 'हिरो' आहे आणि त्याला हवे तितके दिवस पूर्णपणे मोफत तिथे राहता येईल.

नाईक म्हणाले, विनोद कांबळी गेल्या वर्षी आमच्या संस्थेत दाखल झाला होता आणि जवळपास पाच ते सहा महिने आमच्यासोबत राहिला. आम्ही त्याला फिजिओथेरपी व इतर आवश्यक उपचार दिले. तो जेव्हा पहिल्यांदा आमच्याकडे आला, तेव्हा त्याच्यात साधे उभे राहण्याइतकीही ताकद नव्हती, पण उपचारांना त्याने खूप चांगला प्रतिसाद दिला. ते पुढे म्हणाले, यावेळी कांबळी आमच्याकडे आला तेव्हाही आम्ही त्याला आवश्यक फिजिओथेरपी दिली. त्याला मधुमेहाचाही त्रास आहे. रक्तातील साखरेची पातळी जास्त असल्याने त्याच्यावर उपचार करताना अतिरिक्त काळजी घ्यावी लागते. आता त्याची पत्नी त्याला घरी घेऊन गेली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com